RNI NO. MAHMAR/2020/84035







BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ


`` हम देखेंगे
लाजिम है कि हम भी देखेंगे
वो दिन कि जिस का वादा है
जब ज़ुल्म-ओ-सितम के
कोह-ए-गिराँ
रुई की तरह उड़ जाएँगे
हम महकूमों के पाँव-तले
जब धरती धड़-धड़ धड़केगी ''

भगत सिंग यांना
क्रांतीकारी अभिवादन





सोमवार, २४ मार्च २०२५ | वर्ष : ५ | अंक : ८८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Monday, 24 March 2025 | Year : 5 | Issue : 88 | Daily | Rate: Rs. 5/-


# इरफानच्या जीवाची नुकसान भरपाई सरकार कोणाची संपत्ती विकून करणार ?

**नागपूर :** नागपूरमध्ये दंगलीत झालेल्या सांपत्तिक हानीची भरपाई, दंगेखोरांची संपत्ती विकून केली जाईल, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी नागपूरमध्ये केली. याच दिवशी या दंगलीतील पहिल्या मृत्यूची नोंद झाली. त्याच नाव इरफान अन्सारी. याच्या जीवाची भरपाई करण्यासाठी सरकार कोणाची संपत्ती विकणार? असा सवाल यानिमित्ताने विचारला जात आहे.

इरफानच्या कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार त्याचा दंगलीशी काही संबंध नव्हता. तो रेल्वे स्थानकावर चालला होता. संतप्त जमावाने केलेल्या मारहाणीत तो गंभीर जखमी झाला होता. शनिवारी त्याच्या मृत्यू झाला. याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपुरात होते. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला. त्यानंतर पत्रकारांशी बोलतांना दंगलीत झालेल्या नुकसानाची भरपाई



दंगेखोरांकडू करणार, त्यांनी केली नाही तर त्यांची संपत्ती विकणार, असे जाहिर केले. स्टॅलिन यांच्या मते हिंदीसक्तीचा रेटा पण आकडेवारीनुसार तामिळ भाषिकांची संख्या वाढती एक विशिष्ठ समुहच दंगलीसाठी कारणीभूत आहे हे बिंबवण्याचे प्रयत्न सरकारी पातळीवरून केले जात आहे. पोलिसांच्या कारवाई भेदभाव पूर्ण असल्याचा आरोप कॉंग्रेसने केला आहे. बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांवर कारवाई करण्यात पोलिसांकडून झालेल्या विलंबावर सरकारकडून बोलणे टाळले जात आहे. चादर जाळल्या प्रकरणी तक्रार दाखल होताच संबंधितांवर कारवाई करण्यात आली,असा दावा मुख्यमंत्र्यांनी शनिवारी पुन्हा केला.

पण दोन दिवसांपूर्वी झालेल्या मुस्लिम समाजातील बृध्दीजीवींच्या पत्रकार परिषदेत त्यांनी कारवाईला विलंब झाल्याचा दावा केला होता. दंगलीसाठी हेच प्रमुख कारण ठरले, असे हिंसाचार ग्रस्त भागातील रहिवासी सांगतात. ही बाब खरी मानली तर दंगल पेटण्यापूर्वी ती आटोक्यात आली असती व जाळपोळीच्या घटना घडल्या नसत्या आणि नुकसान भरपाई करण्यासाठी सरकारला कोणाची संपत्ती विकण्याची गरज पडली नसती. सरकारच्या म्हणण्यानुसार दंगल पूर्वनियोजित कट होता तर पोलिसांना त्याची खबरबात नव्हती हे त्यांचे अपयश ठरते. त्यामुळे जाळपोळ व झालेल्या नुकसानासाठी ते करणाऱ्या इतकेच सुरक्षा यंत्रणा सारख्या जबाबदार ठरतात. त्यामुळे नुकसान भरपाईसाठी संपत्ती विकायची झाल्यास त्याची यादी लांब असेल. इरफानच्या कुटुंबीयांची झालेली हानी न भरून निघणारी आहे असे बोलले जात आहे.

> **मुख्यमंत्री पहिल्या दिवशीपासूनच दंगल पूर्वनियोजित होती, असे सांगत आहेत. एका विशिष्ट गटाकडे त्यांचा रोख आहे. जाळपोळ हिंसाचार यासाठी दोन्ही गट जबाबदार असल्याचे पोलीस तपासातून सीसीटीव्ही फुटेजमधून स्पष्ट होत आहे. दंगलीत बळी गेलेल्या इरफानचा मृत्यू दुसऱ्या गटाने केलेल्या मारहाणीत झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच त्यांच्या जीवाची भरपाई करण्यासाठी पोलिसाना या मारहाणीच्या घटनेची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी केली जात आहे.**

# हिंदीसक्तीचा रेटा पण आकडेवारीनुसार तामिळ भाषिकांची संख्या वाढती : एम. के. स्टॅलिन

**चेन्नई :** स्टॅलिन यांच्या मते हिंदीसक्तीचा रेटा पण आकडेवारीनुसार तामिळ भाषिकांची संख्या वाढती राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ची अंमलबजावणी करण्यास तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि डीएमके प्रमुख एम.के. स्टालिन यांनी कडवा विरोध केला असून या धोरणाच्या आडून हिंदीची सक्ती करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे. आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की दक्षिणेकडील प्रमुख भाषांपैकी दुसरी आणि संपूर्ण भारतात पाचव्या क्रमांकावरील सर्वाधिक बोलली जाणारी भाषा म्हणून तमिळ भाषा उदयास येत आहे. देशभरात 6.9 कोटींहून अधिक तमिळ भाषिक आहेत, तर तेलुगू भाषिक सर्वाधिक 8.11 कोटी इतके आहेत. आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या दोन्ही राज्यांत दोन्ही दक्षिणेकडील भाषा बोलल्या जातात. 4.37 कोटींहून अधिक कन्नड भाषिक आणि 3.48 कोटींहून अधिक मल्याळम भाषिक आहेत. ही आकडेवारी 2011 च्या जनगणनेनुसारची सर्वात नवीनतम उपलब्ध भाषेबाबतची आकडेवारी आहे. तामिळनाडूची अधिकृत भाषा असलेले तमिळ भाषिक एकूण लोकसंख्येपैकी 88.37 टक्के इतके आहेत. 2011 च्या जनगणनेत तमिळ भाषेअंतर्गत अनेक द्राविडी आदिवासी भाषांचाही समावेश आहे.



> सर्वाधिक तमिळ भाषिक असलेली उत्तरेकडील राज्ये म्हणजे दिल्ली, गुजरात आणि मध्य प्रदेश. इथे अनुक्रमे 82 हजार 719, 40 हजार 072 आणि 20 हजार 544 तमिळ भाषिक आहेत.

भारतातील बहुसंख्य तमिळ भाषिक हे तामिळनाडूचे रहिवासी आहेत. कर्नाटकात 21.01 लाख, पुदुच्चेरीत 11.01 लाख, आंध्र प्रदेशात 7.14 लाख, महाराष्ट्रात 5.01 लाख आणि केरळात 5.03 लाख; या राज्यांचा समावेश जनगणनेत सर्वाधिक तमिळ भाषिक असलेल्या पाच राज्यांमध्ये आहे. या राज्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही राज्यांत एक लाखापेक्षा जास्त तमिळ भाषिक नाहीत. 2011 च्या जनगणनेत तामिळनाडू व्यतिरिक्त या सहा राज्यांतून एकूण 3.36 लाख तमिळ भाषिकांची आकडेवारीत भर पडली आहे.

न्य राज्यातील तमिळ भाषिकांची संख्या 52.73 लाख आहे, जे भारतातील एकूण तमिळ भाषिकांपैकी 7.6 टक्के होते. या भाषेचे दक्षिण भारतीय भाषांमध्येही दुसरे स्थान होते. आंध्र प्रदेशच्या बाहेर 1.05 कोटी भाषिकांसह तेलुगू भाषा पहिल्या क्रमांकावर होती. कर्नाटकाबाहेर 30.55 लाख कन्नड भाषिक होते आणि केरळबाहेर 24.26 लाख मल्याळम भाषिक होते.

# आम्ही वर्णनवादी राहिलो असून कृतिशील वर्तनवादी कधी बनणार : उत्तम कांबळे

## ‘बानाई’तर्फे आयोजित महाड क्रांती परिषदेचे उद्घाटन



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडचा सत्याग्रह केला. हा सत्याग्रह माणूसपणाच्या मुक्तीसाठी समग्र क्रांतीच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीचे पहिले पाऊल होते. या सामाजिक लढ्याला 98 वर्षे लोटून गेल्यानंतरही या क्रांतीचे वर्णनच करीत आहोत. आम्ही वर्णनवादी राहिलो असून कृतिशील वर्तनवादी कधी बनणार, असा सवाल ज्येष्ठ साहित्यिक, कवी, कथाकार, कादंबरीकार उत्तम कांबळे यांनी आज येथे केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंजिनिअर्स असोसिएशतर्फे (बानाई) महाड क्रांतीदिनाच्या पर्वावर आयोजित दोन दिवशीय परिषदेचे उद्धघाटन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बानाईचे अध्यक्ष अरविंद गेडाम होते. यवतमाळचे विचारवंत सागर जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कांबळे म्हणाले, शतकाजवळ पोचलेली महाडची क्रांती एका दिवसात जन्माला आली नाही. त्यासाठी सर्व जातीधर्मांच्या प्रतिनिधींचा गट बाबासाहेबांनी तयार केला होते. महाडच्या सत्याग्रहानंतरही राजकारण, समाजकारण आणि धर्मकारणात सर्व आयुधे घेऊन बाबासाहेब लढत होते. मात्र, आज आम्ही काय करीत आहोत याचा हिशेब मांडण्याची वेळ आली आहे. कल्याणकारी राज्यात तेव्हाच याचा विरोध होण्याची गरज होती, असे मत कांबळे यांनी व्यक्त केले. सागर जाधव म्हणाले, अस्पृश्यतेचे चटके सहन करत असताना त्या काळात ब्रिटिशकालीन न्यायालयांनी आपल्या बाजूने न्यायदान केले. संचालन सचिव जयंत इंगळे यांनी केले. विजय उमरे यांनी आभार मानले.

# न्या. यशवंत वर्मा यांची सात टप्प्यांमध्ये चौकशी

## प्रकरणाचा तपास तीन सदस्यीय समितीकडून

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी आग लागल्यामुळे बेहिशेबी रोख रक्कम सापडली होती. त्यानंतर हे प्रकरण चांगलेच चर्चेत आले आहे. न्यायाधीश वर्मा यांनी हे आपल्याला फसवण्याचे आणि बदनाम करण्याचे षडयंत्र असल्याचे म्हटले आहे. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाच्या अंतर्गत चौकशीसाठी तीन सदस्यांची समिती स्थापन केली आहे. भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी या प्रकरणात शनिवारी तीन सदस्यांची समिती स्थापन केली आहे. यानंतर या संपूर्ण प्रक्रियेचे पहिले चार टप्पे सुरू झाले आहेत. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरोधात तक्रार मिळाल्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडून यासंबंधी रिपोर्ट मागवण्यात आला, त्यानंतर हा रिपोर्ट वाचण्यात आला आणि तीन सदस्य असलेली समिती स्थापन केली गेली.





बऱ्याचदा न्यायाधीशांसंबंधीची अशी प्रकरणे उघड केली जात नाहीत, मात्र सरन्यायाधीश खन्ना यांनी यापेक्षा वेगळी भूमिका घेत, दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचा अहवाल आणि न्यायधीश यशवंत वर्मा यांचे स्पष्टीकरण दोन्ही सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला आहे. चौथ्या टप्प्यात सरन्यायाधीश हे आरोपांची, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या रिपोर्टची आणि आरोप असलेल्या न्यायाधीशांनी मांडलेल्या त्यांच्या बाजूची पडताळणी करतात आणि जर उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी प्रकरणाच्या सखोल चौकशीची आवश्यकता असल्याचे म्हटले असेल तर सरन्यायाधीशांकडून तीन सदस्यांची समिती स्थापन केली जाते. ज्यामध्ये दोन उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि एक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असतात.

# महिला डॉक्टरची गोळ्या झाडून केली हत्या




**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील मेरठमध्ये काही दिवसांपूर्वी मर्चंट नेव्ही अधिकारी सौरभ राजपूतची हत्या झाल्याची घटना घडली. पत्नी मुस्कान रस्तोगी नामक महिलेने तिचा प्रियकर साहिल शुक्लाला बरोबर घेऊन पती सौरभ राजपूतची हत्या केली. या घटनेने संपूर्ण उत्तर प्रदेशात मोठी खळबळ उडाली. या घटनेनंतर आता बिहारमध्ये एक अशीच खळबळजनक घटना घडली आहे. पाटणा शहरातील एका हॉस्पिटलमध्ये घुसून एका महिला डॉक्टरची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे पाटणा शहरात खळबळ उडाली आहे.

# बोलेरोला मालगाडीने उडवले, थोडक्यात बचावला CISF जवान




**जयपूर :** कोळशाने भरलेल्या एका मालगाडीच्या इंजिनने एका केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (CISF) बोलेरो एसयूव्हीला धडक दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राजस्थानमधील एका मानवरहित रेल्वे हॉसिंगवर हा प्रकार घडला. सुरतगड सुपर थर्मल पॉवर प्लांट येथे हा सुरक्षा जवान गस्त घालत असताना ही घटना घडली. या घटनेत जवान थोडक्याच बचावल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या दुर्घटनेत सीआयएसएफची एसयूव्ही कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# समाजमाध्यमांचा गैरवापर करणाऱ्यांवर परभणीत गुन्हे दाखल

**परभणी :** विविध धार्मीक, राजकीय मुद्यांवरून सोशल मिडीयावर वादग्रस्त पोस्ट, कमेंट करणाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून तंबी देण्यात आली आहे. सोशल मिडीयाचा गैरवापर करणाऱ्यांविरुद्ध चार गुन्हे दाखल करण्यात आले असून 21 जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई तर 57 जणांना नोटीसा बजावण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी दिली आहे. सामाजिक सलोख्यावर त्याचा परिणाम होत आहे. याप्रकरणी खबरदारी घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी परभणी जिल्ह्यात सायबर पोलीस ठाण्यासह सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सोशल मिडीया मॉनीटरींग सेलची स्थापना

> 21 जणांवर प्रतिबंधक कारवाई तर 57 जणांना नोटीसा



केली आहे. त्यावरून सर्व पोलीस ठाण्यांसह सायबर पोलीस ठाण्याच्या सोशल मिडीया सेलचे अंमलदार सतत अशा वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यांच्या शोधात आहेत. त्याकरिता विविध टुल्स व हॅश टॅगचा वापर करण्यात येत आहे. सायबर पोलिसांचा सोशल मीडिया सेल सतर्क राहून वादग्रस्त पोस्टवर लक्ष देत असून धार्मीक व राजकीय मुद्द्यांवरून सोशल मीडियावर केलेल्या वादग्रस्त पोस्टवर पोलिस बारकाईने लक्ष ठेवून आहेत. अशा पोस्ट करणाऱ्या प्रोफाइलची माहिती मिळून ती पोस्ट डिलिट करण्यासाठी प्रक्रिया पोलिस पार पाडत आहेत.

# लालकृष्ण आडवाणींची अवस्था पाहून शहाजहानची आठवण येत : संजय राऊत



**मुंबई :** महाराष्ट्रात सध्या औरंगजेब हा विषय चर्चेत आहे. छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर महाराष्ट्रातून औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची मागणी केली जाते आहे. हिंदुत्ववादी संघटना त्यासाठी आक्रमक झाल्या आहेत. तसेच उदयनराजे भोसलेंनीही ही मागणी केली आहे. दरम्यान ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी रोखठोक या त्यांच्या सदरात भाजपावर टीका केली आहे. तसेच लालकृष्ण आडवाणींची अवस्था पाहून शहाजहान ची आठवण येत असल्याचंही म्हटले आहे. औरंगजेबाची कबर म्हणजे मराठ्यांच्या पराक्रमाचे स्मारक आहे. ही कबर उखडण्याची मागणी होते आहे. एक फिल्मस्टार मुलाचे नाव तैमूर ठेवतो त्याचे कौतुक प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी केले होते. लालकृष्ण आडवाणी यांची अवस्था शहाजहान सारखीच झाली आहे. आडवाणी हे हिंदुत्ववाद, राम मंदिर या सगळ्याचे शिल्पकार आहेत. त्यांनी हिंदुत्वाचे शिल्प उभे केले पण त्यांना शहाजहान प्रमाणे एकांतवासात ठेवण्यात आले आहे. हे पण या हिंदुत्ववाद्यांचा चालते आहे. आमचे आडवाणी कुठे आहेत? त्यांना बंदिस्त का ठेवले आहे? असे प्रश्न कबर खोदणाऱ्यांनी उपस्थित केले आहेत का? असे सवाल संजय राऊत यांनी विचारले आहेत.





रजि.नं.महा - 446/17

## झेन बहुउद्देशीय सामाजिक संस्था

कार्यालय : रूपेश टेंभुर्णे, नविन इंदोरा, बाराखोली, कॅनल रोड, नागपूर. मो. 9890083407
कार्यालय : विनोद चहांदे, वैशाली नगर, बस स्टॉप जवळ, नागपूर. मो. 9325260704

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनानिमित्त

**सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन**

नोंदणी शुल्क रू. 20/- फक्त

एकूण भव्य बक्षीस रू. 32,000/-

परिक्षेची भाषा हिंदी राहील.

परिक्षेचे आवेदन स्वीकारण्याची शेवटची तारीख 20 मार्च 2025

परिक्षा दिनांक : रविवार 30/3/2025, वेळ 10.30 वाजता.

: परीक्षा स्थळ :
डॉ. मधुकरराव वासनिक, पी.डब्ल्यु एस.कला, वाणिज्य, सायन्स कॉलेज, कामठी रोड, टेका नाका, नागपूर

| (16 वर्षा वरील) खुला गट | | PRIZES |
|---|---|---|
| 1st | Rs. 5000/- | (समीर कापसे) |
| 2nd | Rs. 4000/- | (रजत जांभुळकर) |
| 3rd | Rs. 3000/- | (चक्रधर दोडके) माजी सहसंचालक, एम.एस.एम.ई. मंत्रालय, भारत सरकार |
| 4th | Rs. 2000/- | (विरू पिल्लेवान) उज्वल इंटरप्रायझेस |
| 5th | Rs. 1000/- | (महेंद्र मेश्राम) |
| 6th | Rs. 1000/- | (अल्का चौकीकर) अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा, महीला विभाग, नागपूर |

| वयोगट : 16 वर्षा खालील | | |
|---|---|---|
| 1st | Rs. 5000/- | (डॉ. मनिष बिहाडे) |
| 2nd | Rs. 4000/- | (डॉ. विजय टेंभुर्णे) |
| 3rd | Rs. 3000/- | (शैलेश चवारे) |
| 4th | Rs. 2000/- | (प्रा. पुष्पाताई घोडके) धम्म प्रचारक, महा. अंधश्रद्धा निर्मुलन समिती जि. पदाधिकारी, नागपूर |
| 5th | Rs. 1000/- | (ॲड.अनमोल गोस्वामी) |
| 6th | Rs. 1000/- | (ॲड. स्माईल गोस्वामी) |

Exam Pattern (परिक्षा पद्धती) 100 Question (100 Marks). Exam Time - 90 Min.

निकाल व बक्षिस वितरण : (विजेत्यांना मोबाईल द्वारा कळविण्यात येईल)
14 अप्रैल 2025 दुपारी 11.00 वाजता.
स्थळ : संविधान चौक, नागपूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने संविधान चौकात झेन संस्थेतर्फे आंब्याचा पना वाटप करण्यात येईल

**अधिक माहिती करिता संपर्क करा**

| संजय फुलझेले | मुरली मेश्राम | रूपेश टेंभुर्णे | श्री विनोद चहांदे | श्री संजय सोमकुवर |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | कोषाध्यक्ष | सहसचिव |
| 9850346787 | 7767048631 | 9890083407 | 9325260704 | 9529803241 |

प्रशांत कोटांगळे, शेखर शेलारे, सुरेश वासनिक, रोशन जांभुळकर, खुशराज (बंडू) सांगोळे

आर्थिक सहकार्य : अल्का चौकीकर, पुष्पा घोडके, आनंद साखरे, आशय सोमकुवर, अनुपमा गजभीये, अमीत गजभीये, प्रकाश सहारे, संतोष गुप्ता, केदार कोचे, क्रीष्णकुमार गजभीये, महेंद्र मेश्राम, नीतीन कांबळे, पप्पु वालदे, प्रलय भालेराव, प्रमोद चव्हाण, प्रसनजीत जांभुळकर, राजु गजभीये, संजय बोरकर, सुमेध मेश्राम, वर्षा चहांदे, प्रतीमा कोचे, योगेश डोंगरे, कुंदन राऊत, सर्वेस उके, नचीकेत मुन, वाणी भाऊ


## 16 व्या अ.भा. डॉ. आंबेडकरी साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

# उन्मादी हिंदूत्वाने देश फुटीरतेच्या उंबरठ्यावर उभा टाकला : संमेलनाध्यक्ष डॉ. प्रकाश मोगले

**नागपूर :** ब्राम्हणशाही आणि भांडवलशाहीने देश पोखरला जात आहे. धर्मांधता आणि उन्मादी हिंदूत्वाने समाजा-समाजातील साहचर्य नष्ट होत आहे. देश फुटीरतेच्या उंबरठ्यावर उभा आहे. धार्मिक ध्रुवीकरणाच्या नादात देशातील मूलभूत समस्या मागे पडल्या आहेत. धर्मराज्य निर्माण करण्याचे धर्मांधांचे मनसुबे आहेत. अशा अस्वस्थ वर्तमान स्थितीत देश एकसंध ठेवण्याचे मोठे आव्हान आंबेडकरी साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीची जबाबदारी आली आहे, असे प्रतिपादन संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ परिवर्तनवादी साहित्यिक डॉ. प्रकाश मोगले यांनी आज येथे केले.

निमित्त होते, अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य संस्कृती संवर्धन महामंडळ आणि निळाई यांच्या संयुक्त विद्यमाने 16 व्या अ.भा. आंबेडकरी साहित्य संमेलनांच्या उद्घाटन सोहळ्याचे. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ परिवर्तनवादी साहित्यिक डॉ. प्रकाश मोगले बोलत होते. प्रारंभी संमेलनाचे उद्घाटन राजस्थानचे साहित्यिक डॉ. एम. एल. परिहार यांच्या हस्ते झाले. कामठी रोड येथील चॉक्स कॉलनीत सुगत बुद्ध विहार



सभागृहात सुरु असेल्या संमेलनात स्वागताध्यक्ष डॉ. परमानंद बागडे यांच्यासहप्रमुख पाहुणे ॲड. आनंद गायकवाड, अरविंद निकोसे, अमृत बनसोड मंचावर उपस्थित होते. डॉ. मोगले म्हणाले, संविधान देशाची कवचकुंडले आहेत. मात्र सत्तेवर आलेल्यांनी संविधानातील समाजवादी आशय हा भांडवलदारांकडे गहाण ठेवला आहे. यामुळे जे जे संविधानाच्या रक्षणासाठी संसदेत आणि संसदेच्या बाहेर रस्त्यावर लढाईसाठी येत आहेत, त्यांचा आदर करुन त्यांच्यासोबत राहण्याचे आवाहन यावेळी डॉ. मोगले यांनी केले.




उद्घाटक परिहार यांनी साहित्यिकांनी केवळ मराठीपुरते मर्यादित न राहाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य भावी पिढीसाठी इंग्रजीतून देश विदेशात पोचविण्याचा वसा स्वीकारावा असे आवाहन केले. हर घर संविधान, हर घर बुद्ध ॲण्ड धम्म पुस्तक पोचविण्यातून एक नवी सांस्कृतिक क्रांती देशभर सुरु केली असल्याची माहिती यावेळी परिहार यांनी दिली. ॲड. आनंद

> **ही परिस्थिती कशी परवडेल?**
> कलिंग युद्धानंतर सम्राट महाअशोकाने हातातील शस्त्र खाली ठेवले, बुद्धाला शरण गेले. सम्राट अशोकाला दुसरे युद्ध परवणारे नसेल, तर ज्यांचा रोजीरोटीचा प्रश ?न सुटलेला नाही, त्या देशात धर्मा-धर्मातील युद्ध कसे परवडेल असे डॉ. मोगले म्हणाले.

गायकवाड म्हणाले आंबेडकरी साहित्याने आत्मभान जागवले. बाबासाहेबांनी दिलेला बुद्धाचा परिवर्तनाचा विचार आमचा आचार झाल्यास हा विचार टिकवण्याची जबाबदारी आम्ही ठामपणे स्वीकारू असेही गायकवाड म्हणाले. अमृत बनसोड यांनी कार्यकर्ता आणि साहित्यिक चळवळीची दोन चाकं होती, परंतु वर्चस्वाच्या लढाई कार्यकर्ता आणि साहित्यिक हरवला असल्याची खंत व्यक्त केली. यावेळी विविध ग्रंथ पुरस्तकांचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. संचालन संयोजक प्रवीण कांबळे यांनी केले. प्रास्ताविक सुरेश वंजारी यांनी केले. भूमिका प्रा. सीमा मेश्राम यांनी विशद केली.

# संपादकीय

## ज्याचे जळते त्यालाच कळते!

महाराष्ट्रात राजकारणाचा स्तर हा 2014 नंतर पूर्णतः घसरत गेला आहे. सध्याची परिस्थिती पाहिली तर अगदी तळ गाठलेला दिसतो. राजकारण हे राजकारण असते. त्यात व्यक्तिगत द्वेष आणण्याचे काही कारण नाही, मात्र राज्यात राजकारणातून व्यक्तिगत त्रास द्यायचे काम सुरू आहे, अशी चर्चा चौफेर सुरू आहे. महाराष्ट्र राज्यात सुरू असलेल्या राजकीय, सामाजिक परिस्थितीवर सर्व सामान्य लोक भाष्य करतात. खंत व्यक्त करतांना दबक्या आवाजात बरेच काही बोलतात. कधी नाही ती कंबरे खालची भाषा आणि एकेरी भाषा सध्या जोरात सुरू आहे. सत्तेसाठी सारे काही असे बरोबर नाही. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ प्रकाशित शिवछत्रपती पुस्तक अनेकांच्या आवडीचे हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि आदीलशाही, निजामशाही याचा रोमांचक इतिहास आहे. औरंगजेबाबद्दल कोणाला आस्था असण्याचे कारण नाही. मात्र सध्या महाराष्ट्रातील महत्त्वाच्या विषयांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यासाठी काही विषय पुढे केले जात आहेत. महागाई, बेरोजगारीचा प्रश्न, शेतमालाला भाव नाही, राजरोस अत्याचार सुरू आहेत. बीडसारखी प्रकरणे घडत आहेत. त्याची शाई सुकत नाही तर परभणीची घटना अजूनही ताजी आहे. संतोष देशमुखच्या विषय किती तरी दूर गेला आहे. मग नागपूर संदर्भात विचार केला तर येथेच का वातावरण खराब झाले हा प्रश्नच आहे ? नागपूर शांत आणि सुरक्षित शहर म्हणून ख्याती प्राप्त शहर आहे, पण येथील वातावरण दूषित झाले आहे. बोलाची कढी आणि बोलाचा भात, अशीच अवस्था आहे. ज्याचे जळते त्यालाच कळते. नागपुरला दंगल झाली आणि राज्यातील सगळे वातावरण गढूळ झाले आहेत. बंधुभावाचे वातावरण राज्यात राहिले पाहिजे, ही सरकारची जबाबदारी आहे. असे असतांना सरकारकडून चुकीच्या गोष्टीला प्रोत्साहन मिळत असेल तर ते दुर्दैवी आहे. अनेक मंत्री इतिहास पुरुषांना एकेरी शब्दात शेलक्या भाषेत उल्लेख करतात. हे बरोबर नाही. विधानसभा भवनात बसलेल्या लोकप्रतिनिधींनी विचारपूर्वक आणि समतेची भाषा करावी तरच राज्यात हिंदवी राज्य, शिवशाही, लोकशाही जिवंत राहील. शहरात आणि गावगावात वातावरण दूषित होत आहे. तुम्ही राज्य दंगली चाललेल्या महाराष्ट्रावर करणार की बंधूभाव असलेल्या महाराष्ट्रावर, हे ठरवायची जबाबदारी सरकारची आहे? लोकप्रतिनिधींनी लोकांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी एकत्र कार्य केले पाहिजे. मंदिर, मस्जिद, चर्च, कबर यावर चर्चा करून अनेक जीवन मरण्याच्या प्रश्नाला बगल दिल्या जात आहे. लोकशाहीमध्ये असे चालत नाही. या पार्श्वभूमीवर जनतेने निवडणुकीतून उत्तर देणे गरजेचे आहे. उपोषणाच्या माध्यमातून राजकीय वातावरण ढवळून निघाले. ते 2022 - 2023 पासून राजकारणात बदल झाला 2014 पासून त्या उपोषणाचे वाईट परिणाम आज महाराष्ट्र भोगतो आहे. उपोषणवाली टोपी आता गप्प का आहे ? अनेक जीवनमरणाचे प्रश्न आहेत. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी कुणीच का पुढे येत नाही. खरे तर महाराष्ट्रात राजकारणाचा स्तर हा 2014 नंतर पूर्णतः घसरत गेला आहे. आता राजकारणाच्या स्तराने तळ गाठलेला दिसतोय. राज्यात कुठे एखादा किरकोळ घोटाळा उघड होतोय, मात्र अनेक घोटाळेच घोटाळे राज्यात सुरू आहेत अशी खुली चर्चा समाजात सर्वत्र सुरू आहे. जसजसे लोकांत जनजागृती होईल ते या सरकारच्या विरोधात वातावरण निर्माण होईल. विचारतो महाराष्ट्र नागपूर दंगल नंतर रस्त्यावरच्या घरची चूल कशी पेटली असेल? दंगलीत ज्यांची मालमत्ता जाळण्यात आली त्यांचा जीव काय म्हणत असेल? ज्यांच्या घरातला जीव गेला असेल त्यांना काय वाटत असेल? असे अनेकांना प्रश्न निर्माण झाले आहेत? दंगल तणावाच्या घटनेनंतर महाल, इतवारी, गोळीबार चौक, मस्कासाथ, मोमीनपुरा, गांधीबागसह इतर भागातील बाजारपेठा गेल्या दोन दिवसापासून बंद आहे. त्यामुळे 350 कोटींपेक्षा अधिकची उलाढाल ठप्प झाली आहे. अगदी गुढीपाडवा, रमजान आणि लग्नसराईच्या तोंडावर व्यवसाय बंद असल्याने व्यापारी चिंतेत आहेत. अधून मधून रात्री तणावाची स्थिती निर्माण झाली तर पोलीस यंत्रणेवर ताण येतो. वातावरण शांत होईल यात शंका नाही. मध्य नागपुरात वातावरण गढूळ झाल्याने शहरातील अनेक भागांत संचारबंदी लागू केली आहे. त्यामुळे कायम वर्दळ असलेल्या महाल, इतवारी, मस्कासाथ, गोळीबार चौक, गांधीबागसह इतरही बाजारपेठांमध्ये सध्या शुकशुकाट आहे. सोमवार ते बुधवारपर्यंत अंदाजे 150 कोटींच्या जवळपास उलाढाल ठप्प होती. गुरुवार पासून थोडी शिथिलता आली. पूर्वी नागपूर मध्य भारतातील महत्त्वाची बाजारपेठ होती. आता त्या बाजारपेठेचे महत्त्व कमी झाले असल्याने उलाढाल कमी झाली आहे. तरीही काही व्यापारी दोन ते तीन दिवसांनी नियमीत खरेदीसाठी येत असतात. बंदमुळे त्या व्यापाऱ्यांनी बाजारपेठेकडे पाठ फिरवली आहे. अनेकांनी दुसऱ्या बाजारपेठेकडेही मोर्चा वळवला आहे. त्यामुळे काही व्यापारी कायमचेच ग्राहकांना मुकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शहराच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात ठोक व्यापारी तयार झालेले आहेत. त्यांचे दिवस चांगले आले असतांना आमच्यावर मात्र अवकळा आली असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. कारण इतवारी, महाल, गांधीबाग आणि परिसरात फुटपाथवर दुकाने लावून बसणाऱ्याची संख्या मोठी आहे. चहापाणी, लिंबू पाणी, भेळ, पकोडे, फळवाले, भाजीपाला, थटेरी मनेरीवाले, हारफुलवाले, रिक्षेवाले, हमाल आणि कित्येकांची पोट हातावर आणून पानावर खाणारी आहेत. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तणावाच्या स्थितीमुळे बाजारपेठ बंद असून व्यापार प्रभावित झाला आहे. दोन दिवसांत किराणा व्यवसायातील 15 ते 20 कोटींची उलाढाल ठप्प झाली आहे. शनिवारपर्यंत बाजारपेठ बंद राहण्याची शक्यता असल्याने 50 कोटींपेक्षा अधिकचा किराणा व्यवसाय ठप्प होईल तर इतवारी आणि गांधीबाग कापड व्यापाराचे हब आहे. रमजान, गुढीपाडवा, लग्नसराईच्या निमित्ताने खरेदीचा उत्साह या बाजारात होता. बंदमुळे त्यावर संक्रांत आली असून कोट्यावधीचा व्यवसाय ठप्प झाला आहे. अजून काही दिवस बाजारपेठ बंद राहिल्यास त्याचा फटका उलाढालीला बसणार आहे. नुकत्याच दंगलीमधे सापडलेल्या एका व्यक्तिचा दवाखान्यात उपचार करताना हकनाक मृत्यू झाला. ज्या कोणत्या कुटुंबातील व्यक्ति असतील त्याचा आधारवड गेला. कोणत्याही परिस्थितीत वस्तीतून मोर्चा काढण्यात परवानगी देऊन नये. मोर्चा जरी शांत असला तरी कोणी तरी समाजकंटक त्यात असतात ते जाळपोळ आणि दंगल घडवितात. लोकशाहीत आपल्या न्याय मागण्यासाठी आंदोलन गरजेचे आहे. धरणे, निदर्शने, मोर्चा काढून आपल्या मागण्यांसाठी लोकलढा आहे. मात्र राज्याचा मुख्यमंत्रीच गुन्हेगारीला प्रोत्साहन देत असेल तर आणि जातीय तेढ निर्माण करणारी भाषा वापरत असेल तर यापुढे समाजाने काळाची पावले ओळखून अशा लोकांना धडा शिकवण्याची गरज आहे हा सत्ता आहे उद्या नसेल ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे शत्रूवरही प्रेम करायला शिकवणारा हा देश आणि महाराष्ट्राची परंपरा आहे या महाराष्ट्राला लाभलेल्या परंपरेला काळीमा फासण्याचे काम सध्याचे सत्याधीश करीत आहेत आणि तेही जाणीवपूर्वक तेव्हा समाजाने या कामात या सत्तापीपासून ना त्यांच्या मनसुभ्यांना कुठल्याही प्रकाराने खतपाणी न घालता त्यांच्या मनसोबांना बळी न पडता महामानवांच्या विचाराने गतिशील होण्याची गरज आहे त्याचे प्रत्यंतर काल-परवाच्या दंगली नंतर बघायला मिळाले त्यासाठी आम्ही जनतेला धन्यवाद देतो. तूर्तास इतकेच! ■ ■

बहुजन सौरभ

# न्यायालयांचे बदलते रंग!

*मागच्या काही दिवसांपासून, देशातील काही उच्च न्यायालयांनी काही खटल्यांच्या संदर्भात दाखवलेली असंविधानिक आणि असहनीय सक्रियता सद्या देशात चर्चेचा विषय बनले आहेत. यात भर पडली आहे ती, दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या दिल्लीस्थित बंगल्यात लागलेली आग आणि त्यावेळी सापडलेली रोख रक्कम याची.*

यावरून न्यायमूर्तीचा बौद्धीक स्तर, न्यायालयांची विश्वासार्हता, न्यायालये एकांगी आणि शासनधार्जिणे बनत चालली आहेत की काय? असे अनेक प्रश्न भारतीय नागरिकांच्या मनात डोकावत आहेत. काही न्यायमूर्तींची वक्तव्ये तर संविधानिक, कायदेयोग्य आहेत की मनुस्मृतीपुरक आहेत? हे ही भारतीय नागरिक तपासत आहेत. म्हणून न्यायालये आणि न्यायमूर्ती संशयाच्या आणि विश्वसार्हतेच्या गर्तेत सापडले आहेत. याची काही उदाहरण लक्षात घेता भारतीय न्यायव्यवस्था ही कुणीकडे झूकली आहे? याची प्रचिती येते. भारतीय न्यायव्यवस्था दोन प्रकाराच्या भ्रष्टाचाराने ग्रस्त आहे. एक सामाजिक आणि दुसरी आर्थिक. 1999 मध्ये ओ. आर. जी. मार्ग यांनी एक सर्व्हेक्षण केले होते, त्यात न्यायालयात भ्रष्टाचार होतो याची पुष्टी मिळते. तसेच प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या 50 व्या वर्ष महोत्सवातील भाषणात न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराबद्दल असंतोष व्यक्त केला होता. आणि जनतेला निष्पक्षपणे न्याय देणे हे न्यायालयांचे नैतिक दायीत्व आहे, असे सांगून न्यायिक आयोग स्थापण्याची घोषणा केली होती. या न्यायिक आयोगाचे काम हे न्यायालयीन भ्रष्टाचारास रोखण्याचे असेल, असेही त्यांनी जाहीर केले होते. तेंव्हा, सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींनी न्यायिक आयोगाची स्थापना करू नका. आम्हीच सुधरू आणि आमच्यासाठी एक आचारसंहिता बनवू म्हणून न्यायमूर्तींसाठी एक आचारसंहिता बनवली होती, ज्यात एकूण सोळा गोष्टींचा समावेश आहे. पण भ्रष्टाचारास रोक लावण्याचा उपाय नाही. न्यायालयातील अनेक माजी न्यायमूर्तींनी न्यायव्यवस्थेत भ्रष्टाचार होतो, हे मान्य केलेले आहे.

भारताचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. एस. पी. भरूचा यांनी केरळ मधे दिलेल्या भाषणात हे मान्य केले होते की, न्यायव्यवस्थेत वीस टक्के भ्रष्टाचार आहे. तो आता वाढत जाऊन करोडो रूपयांच्या घरात गेला आहे. यावरून न्यायालयांच्या निकालाची गुणवत्तेची, दर्जा, पारदर्शकता, निष्पक्षता आणि विश्वासार्हतेवर भारतीय नागरिक प्रश्नचिन्ह उपस्थित करू लागले आहेत. त्याचबरोबर 1) उत्तर प्रदेशातील अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शेखर कुमार यादव यांनी नुकतेच विश्व हिंदू परिषदेच्या मंचावर जाऊन देशातील बहुसंख्यांकांच्या बळावर काही वादग्रस्त विधाने केली.

2) सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती ए. आर. दवे यांनी अहमदाबादेत गुजरात लॉ सोसायटीने आयोजित केलेल्या परिसंवादात, 'मी जर भारताचा हुकूमशहा असतो, तर पहिल्या इयत्तेपासून शाळेत गीता, रामायण व महाभारताचा अभ्यासक्रम सुरू केला असता. मला जर कोणी धर्मनिरपेक्ष म्हणत असेल तर माफ करा मी धर्मनिरपेक्ष नाही', असे असंविधानिक वक्तव्य केलेले आहे.

3) मागच्या आठवड्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राममनोहर मिश्रा म्हणतात, अकरा वर्ष वयाच्या मुलीचे खाजगी अवयव ओढले, तसेच अंगवस्त्र फेडले तर तो बलात्कार होत नाही.



ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

4) अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गोविंद राय म्हणतात, लग्नाचे वचन देऊन वर्षभर शारीरिक संबंध स्थापित केले आणि आता तो लग्न करणार नाही हे लक्षात आल्यावर मुलगी कोर्टात जाते आणि बलात्काराचा गुन्हा नोंदवायची विनंती करते तेंव्हा तो कोर्टात असे सांगतो की, मुलीला मंगळग्रह आहे आणि अशा मुलीसोबत लग्न केले तर नवरा मरतो. यावरून न्यायमूर्ती खरेच लखनौ विद्यापीठातील ज्योतिष विभागाला मुलीच्या कुंडलीत मंगळ आहे का बघण्याचे आदेश देतात

5) गुजरात उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती समीर दवे म्हणतात, सोळा वर्ष वय असलेल्या मुलीसोबत बलात्कार होतो ती मुलगी गर्भ राहिल्यानंतर गर्भपात करण्याचा कायदेशीर अर्ज न्यायालयात सादर करते



बहुजन सौरभ

यावरून हे न्यायमूर्ती म्हणतात, हे तर काहीच नाही, तू मनुस्मृती वाच मग तुला कळेल. असे किती आणि कुणाकुणा न्यायमूर्तींची मते, वक्तव्ये सांगायचे?

6) राजस्थानातील उच्च न्यायालयाने भंवरी देवी केसच्या निकालामधे म्हटले आहे की, जे दलितांना स्पर्श सुद्धा करीत नाहीत, ते अशा महिलेवर बलात्कार कसे करू शकतात? असे म्हणून सर्व आरोपी निर्दोष सोडले. हि आहे ती मनुस्मृतीपुरक मानसिकता. म्हणून अशा विषम विचाराचे न्यायमूर्ती हे देशातील संविधानिक न्यायालयात असता कामा नये. ते देशातील दलित, आदिवासी, ओबीसी - बहुजन, भटके, विमुक्त, महिला, मुस्लिम, ख्रिश्चन ई. विषयी आकस बाळगून असणारे दिसतात.

हे मनुस्मृती या विषम कायद्याने वागणारे, बोलणारे आणि निकाल लावणारे न्यायमूर्ती आहेत. न्यायमूर्ती हे देशाचे असतात. ते कुण्या एका जातीचे, धर्माचे, पंथाचे नसतात. ते न्यायाचे असतात. वर्तमानात जे तर्कदोषी निकाल येत आहेत, किंवा आस्था, भावना, बहुसंख्यांकांचे मत यावर निकाल येत आहेत, या पार्श्वभूमीवर या न्यायमूर्तीचे असे विषम वक्तव्य, भ्रष्ट आचरण, बघून आता यांच्या संविधानाप्रती आणि कायदेशीर असलेल्या निष्ठा आणि नैतिकता तपासण्याची वेळ आली आहे. त्यांनी विषम विचारांना बळकटी प्राप्त करून देणारे मत, वक्तव्य व्यक्त करू नये. देशाच्या न्यायमूर्तींचे मत हे कोण्या एका धार्मिक बहुसंख्यांकांच्या विषम धर्मग्रंथातील विचाराची बाजू घेणारे किंवा त्या विचारास खतपाणी घालणारे नसले पाहीजे. नाही तर मग ते देशाच्या एकतेला, सार्वभौमकतेला, बंधूभाव, स्त्री सन्मानतेला खिळखिळे करणारे ठरू शकते. म्हणून त्यांचे विषम वक्तव्य देशावर लादणे योग्य नाही. देशाच्या सर्वधर्मसमभावाला, स्त्री - पूरूष लैंगिक समानतेला नाकारणाऱ्या, देशाच्या सार्वभौमत्वाला तडा देणाऱ्या, भ्रष्टाचार करणाऱ्या न्यायमूर्तींवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही झालीच पाहीजे.

त्याचबरोबर मागे दोन महिन्यापूर्वी सुद्धा उत्तर प्रदेशच्या वाराणसी शहरात बजरंग दलाच्या मंचावर दोन डझनच्यावर निवृत्त न्यायाधीश एकत्र आले होते, तेंव्हा त्यांनीही एकाच धर्मीयांची रि ओढली होती. अशा प्रकारे मंचावर जाणे हे त्यांना जरी योग्य वाटत असले, तरी मला असे वाटते की, न्यायमूर्ती हे अशा प्रकारच्या वैयक्तिक कक्षेत आणि क्षमतेत येत नसून ते सार्वजनिक कक्षेत आणि क्षमतेत मोडतात. म्हणून त्यांनी संविधानिक मूल्ये जसे की, समता, सामाजिक न्याय, बंधुभाव, सर्वधर्मसमभाव, देशाची एकता, अखंडता, स्त्री - पूरूष लैंगिक समानता जपणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी प्रथमतः आणि अंतिमतः संविधानिक मुल्यांना, कायद्याला आणि देशहिताला प्राधान्य द्यायला हवे. खरे तर विद्यमान न्यायमूर्तींनी संविधानिक भाष्यच केले पाहीजे, त्यांनी कायदेशीर भाष्यच केले पाहीजे. हेच भारतीय नागरिकांना अभिप्रेत आहे. त्यांनी संविधानातील मुल्यांचे जतन आणि रक्षण करायला पाहीजे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शरद कुमार यादव हे यापूर्वी सुद्धा असे म्हणालेले आहेत की, संसदेने कायदा करून भगवान राम, भगवान कृष्ण, वेदव्यास, वाल्मिकी रामायण, गीता यांचा मान सन्मान वाढवणारा आणि आदर करणारा कायदा केला पाहीजे. मग बाकी धर्मियांच्या देव देवी पुजा अर्चा, महापुरूषांबद्दल आपली भूमिका ती काय? न्यायमूर्ती यांना त्यांचे वैयक्तिक मत व्यक्त करण्याचा संविधानिक आधिकार निश्चितच आहे. पण उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून त्यांचे हे मत देशहिताचे निश्चितच नाही. ते सर्वसमावेशक ही निश्चितच नाही. ते भारतीय नागरिक म्हणून विविध मूल्यांचा अनादर करणारेच जास्त आहे. म्हणून मला असे वाटते की, विद्यमान न्यायमूर्तींचे असे विषम, द्वेषी मते, वक्तव्ये आणि भ्रष्टाचार हा महाभियोगाच्या दायऱ्यात येतो. म्हणून असे मनुस्मृतीपुरक, विषमतावादी न्यायमूर्ती देशातील न्यायालयांतून असणे, हा देशाचा अवमान ठरेल. ■ ■

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निष्ठावंत अनुयायी, आंबेडकरी साहित्याचे आयुष्यभर जतन करणारे सर्वांचे आवडते 'दादाजी' म्हणजे माझे पूज्य बाबा स्मृतिशेष डी.एफ. मानकर यांचा आज, 24 मार्च रोजी 33वा स्मृतिदिन त्यानिमित्त...

# माझे पूज्य बाबा



बहुजन सौरभ

*केला संग्रह बुद्ध तत्त्वाचा*
*ज्ञानाचा समाजप्रवर्तक भीमाचा ना*
*मिळविली धनसंपदा*
*वरद शिरी धम्म प्रसादाचा*
*तोचि आसरा आज मम जीवनाचा 77*

युगप्रवर्तक. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एकनिष्ठ अनुयायी दाजीबा फकीराजी मानकर यांचा जन्म 20 एप्रिल 1923 रोजी नागपूरजवळ कान्होलीबारा गावात झाला. घरची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. कालांतराने नागपूरच्या शासकीय मुद्रणालयात दादाजींना कम्पोजिटर म्हणून नोकरी मिळाली. दरम्यान अतिशय हुशार असलेल्या वडील बंधूचे (विनायक) आकस्मित निधन झाले. त्याच्या जाण्याने दुःखी, कष्टी झालेल्या दादाजींनी मोठ्या धैर्याने आपले आयुष्य धम्मकार्याला वाहून घेण्याचा संकल्प जाहीर केला. 1956 च्या धम्मदीक्षेनंतर ते आंबेडकरी चळवळीकडे आकर्षित झाले.

***झाला बुद्धमय जीवनी***

*मानवा मानवात*
*सर्वत्र बुद्ध देखे नयनी ।*

बौद्ध-आंबेडकरी साहित्य गोळा करण्याचा त्यांना विलक्षण छंद जडला. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी हा छंद जोपासला. संग्रहाला त्यांनी 'भीम भांडार' असे सुरेख नाव दिले होते. सोबतच अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ स्वहस्तक्षराने लिहून ठेवले. 'अशोक चरित्र' (वासुदेव गोविंद आपटे, फेब्रु. 1929), 'अछूत कौन और कैसे ? '(डॉ. भीमराव आंबेडकर), 'आंबेडकर का जीवन संघर्ष' (रामचंद्र बनौधा), 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' (धम्मानंद कौसांबी), 'घटना भारतीय बौद्ध महासभा' 'प्रबुद्ध आंबेडकर', 'बौद्धांचा देव', 'जीवनामृत भांडार', दा. न. शिखरे लिखित 'स्वतंत्र भारताचे पहिले विधीमंत्री डॉ. आंबेडकर' इ. ग्रंथाचा समावेश आहे. सोबतच बोधिसत्त्व, संग्राम विजय, कल्याणमित्र, बौद्ध भारत, रिपब्लिकन, जनता, प्रबुद्ध भारत, भीमशक्ती, भीमयुग, भीम गर्जना, भीम पत्रिका, जागृती इ. पाक्षिके त्यांच्या संग्रही होती. मोठ्या चिरंजीवाच्या स्मृतिप्रित्यर्थ पश्चिम नागपुरात गोपालनगर परिसरात 'विनायक स्मृति वाचनालय' सुरू केले होते. तत्कालीन अनेक प्रसिद्ध विचारवंतानी, बौद्ध भिक्खूंनी वाचनालयाला भेट देऊन मुक्तकंठाने प्रशंसा करून गौरवोद्गार काढले होते आणि आपले अभिप्राय डायरीत नोंदविले होते. ज्या ज्या ठिकाणी सभा, बौद्ध मेळावे, धम्म परिषदा होत त्या त्या ठिकाणी ते आवर्जून उपस्थित राहायचे. मौलिक, बोधप्रद सुभाषिते ते डायरीत नमूद करायचे. त्यांच्या या छंदामुळेच बाबू हरिदासजी आवळे, प्रा. धम्मदूत भिक्खू सिवलीबोधी, डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन, भदन्त धीरधम्म इ. थोर महापुरुषांसोबत निकटचा सहवासासोबतच मित्रत्वाचे आणि जिव्हाळ्याचे मधुर संबंध प्रस्थापित झाले होते.

***लाभला बुद्ध तत्त्वाचा अलभ्य आधार***
***जगण्या सुखी***
***समाधाने जीवन ।***
***शरण गेला बुद्धाच्या***
***चरणी***
***सदानकदा विहारात***
***साधना करी ।***



मिलिंद मानकर
मो. 8080335096

नागपूरच्या दीक्षाभूमीवरून 26 मे 1972 रोजी सारनाथ धम्मयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रवासाचे मार्मिक वर्णनही त्यांनी आपल्या सुवाच्य हस्ताक्षरात लिहून ठेवले आहे. मी जेव्हा जेव्हा या धम्मप्रवासाचे वाचन करतो तेव्हा तेव्हा माझे हृदय भरून येते. डोळे पाणावतात. पश्चिम नागपूरतर्फे तत्कालीन महापौर रामरतन जानोकर यांचा भव्य नागरी सत्कार 1975 रोजी करण्यात आला होता. त्याप्रसंगी दादाजींनी अतिशय सुंदर 'मानपत्र' जानोकर यांना अर्पण केले होते. कार्यक्रमाचे संयोजक माझे बाबाच होते.

'बाबा तुम्हारे जाने के बाद', 'बाबू आवळे यांचा जीवन संघर्ष', 'युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथांची त्यांनी निर्मिती केली. 'बाबू आवळे यांचा जीवन संघर्ष' या ग्रंथाचा प्रकाशनाचा वेळी त्यांना प्रखर संघर्ष करावा लागला. सार्वजनिक लोकवर्गणीतून हा ग्रंथ उदयास आला. वर्गणी गोळा करण्यासाठी उन्हातान्हात पायी फिरून त्यांनी अपार कष्ट उपसले होते. डॉ. आंबेडकरी चळवळीप्रती त्यांचा विलक्षण श्रद्धाभाव पाहून अनेक दानदात्यांनी. चाहत्यांनी त्यांना निःसंकोचपणे आर्थिक मदत केली होती. ज्यात मा. नानाजी शामकुळे, मा. एकनाथजी हावरे, मा. नागेश गजभिये, मा. सागरबाबू डंभारे, मा. शालीग्राम ढोरे आणि इतर मान्यवरांचा समावेश होता. 1984 रोजी आवळे प्रकाशनातर्फे हा ग्रंथ प्रकाशित झाला.

***कृपाप्रसादे तथागतांच्या***
***आनंद फुलला जीवनी कृतार्थ झाले***
***जीवन***
***ध्यास उपासनेचा उरी।***
***लोपल्या वेदना व्यथा मनीच्या***
***सुखे आनंदे विहार करी जीवनी॥***

सेवानिवृत्तीनंतर शेजारीच असलेल्या संघमित्रा बुद्ध विहाराची दादाजी नियमितपणे पहाटे पाच वाजता उठून साफसफाई करायचे. त्यांचा हा उपक्रम सतत दहा वर्षे सुरू होता. विहार कसे असावे? याचा मूर्तिमंत आदर्श त्यांनी बौद्ध समाजासमोर ठेवला होता. तीन तपानंतरही त्यांच्या चांगुलपणाचे, दयाळू अंतःकरणाचे गोडवे आजही परिसरात गायिले जातात. आयुष्याचा सांध्यसमयी धम्मदूत भिक्खू सिवलीबोधी यांच्या जीवन व कार्यावर ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा मानस होता. त्यांचे महान स्वप्न अपुरे राहिले. आंबेडकरी चळवळीत रममाण असतानाच त्यांचे 24 मार्च 1992 रोजी निधन झाले. मोठ्या कष्टाने, परिश्रमाने संग्रहित केलेले बरेचसे साहित्य काळाच्या ओघात नष्ट झाले. जीर्ण झाले. हाताचा स्पर्श झाल्यास पाने गळून पडतात. संग्रहित करण्यासाठी जागेचा अभाव, विविध अडचणी आहेत. हा मौलिक ठेवा जतन करणे काळाची गरज आहे.

***गेला निघूनी जन्मदाता***
***देऊनी शुभाशीर्वाद मला***
***बुद्धमंत्र - बाबांच्या ज्ञानाचा***
***घेई मुजरा मानाचा तव पुत्राचा ॥*** ■ ■

## बहुजन मानस





नागेश चौधरी ( बहुजन विचारवंत )
9970873560

# हंटर कमिशन, म. फुले आणि आरक्षण

म. फुल्यांनी हंटर कमिशनला मेमोरॅडम 19 ऑक्टोबर 1882 ला सादर केले होते आणि त्यांनी त्याला सूचना केल्या होत्या. त्यात त्यांनी प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ करावी.

ग्रामीण भागात नगण्य शाळा आहे तिकडे लक्ष द्यावे.

प्राथमिक शिक्षणावरील खर्चात वाढ करावी. उच्च शिक्षण फक्त ब्राह्मण आणि तत्सम जाती घेतात आणि बहुतेक शिक्षक ब्राह्मण आहेत मात्र शूद्र जातीचे नगण्य आहेत. शिक्षणात विज्ञान शिकविले जावे.

त्यांनी स्त्रियांमधे प्राथमिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात व्हायला हवा असेही मत मांडले होते. शिक्षणातून जास्त नोकऱ्या ब्राह्मणादि जातीना मिळतात आणि त्यामुळे शासकीय कारभारात तेच असतात. म्हणून त्यांनी आरक्षण हा मुद्दा मांडला होता आणि त्याला खुद्द सर वि. हंटर यांचा पाठिंबा होता. ही भारतीय इतिहासातील एक महत्वपूर्ण उपलब्धी म्हणता येईल. त्यांच्या सूचनांची दखल कमिशनघेतल्याचे दिसून येते. दुसरे म्हणजे हंटर कमिशनने शिक्षणातून धार्मिक शिक्षण देऊ नये अशी ही शिफारस केली होती म्हणजे इंग्रज सुद्धा शिक्षण धर्मनिरपेक्ष असावे या मताचे होते आणि आजकाल भारतात मात्र मनुस्मृती व वेद शिकवायला हवे असे विचारच मांडले जात नाहीत तर काही राज्यांनी ते देणे पण सुरू केले आहे. यावरून इथे आणखी मागे जाण्याचे प्रयोग अमलात आणणे सुरू आहे.

***1882 मध्ये विल्यम हंटर आणि ज्योतिराव फुले यांनी मुळात जातीवर आधारित आरक्षण व्यवस्थेची कल्पना मांडली होती. आज अस्तित्वात असलेली आरक्षण प्रणाली खऱ्या अर्थाने 1933 मध्ये ब्रिटिश प्रधानमंत्री रामसे मॅकडोनाल्ड यांनी 'कम्युनल अवॉर्ड' प्रदान केली तेव्हा सुरू***







1882 च्या हंटर कमिशनचे अध्यक्ष विल्यम हंटर होते आणि त्याची नियुक्ती भारताचे त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड रिपन यांनी केली होती. 3 एप्रिल 1882 रोजी कमिशनची स्थापना करण्यात आली.

**या कमिशनच्या मूळ शिफारशी अशा-शिफारशी**

1882 च्या हंटर कमिशनने प्राथमिक शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी अशी शिफारस केली. प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी अधिक प्रशिक्षण शाळा स्थापन केल्या पाहिजेत. मॉडेल सरकारी हायस्कूल स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती, अशीच शिफारस करण्यात आली होती की शालेय अभ्यासक्रमात व्यावहारिक पैलू आणि स्थानिक गरजांवर भर देण्यात यावा. सरकारी शाळांमध्ये धार्मिक शिक्षणावर बंदी होती. मागासवर्गीयांना योग्य शिक्षण मिळावे यासाठी हंटर एज्युकेशन कमिशनमध्ये अनेक शिफारशी करण्यात आल्या होत्या आणि त्यात आरक्षण हा मुद्दा होता. म्हणूनच इंग्रजांनी आरक्षण मान्य केले. (Drishti.iias web.) मुस्लिमांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांना योग्य सुविधा देण्यासाठी आयोगाने अनेक शिफारशी केल्या आहेत. ■ ■

# एकचालकानुवर्ती पक्षांचा घसरता आलेख

## वाचकांचे मनोगत

बहुजन सौरभ

आंबेडकरी विचारधारेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याला विशेष स्थान आहे. लोकशाही व्यवस्थेचा तो कणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली विद्वत्ता आणि विचारांशी पक्की बांधिलकी या तत्वावर चळवळी चालवल्यामुळे त्यांना अपेक्षित असे यश मिळत गेले. त्या काळात त्यांना अंतर्गत विरोध करणारेही होते. पण त्यांची डाळ डॉ. बाबासाहेबांनी शिजू दिली नाही. विशेषतः राजकीय आडाखे बांधून काही कार्यकर्ते जेव्हा त्यांच्याशी युक्तिवाद करीत होते, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या निर्णयावर ठाम असत. त्यांच्या महानिर्वाणानंतर मात्र सर्वच विस्कळीत झाले. राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अश्या कोणत्याही क्षेत्रातील संघटना दीर्घ काळ एकसंघ राहू शकल्या नाहीत. एकाच क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनांमध्ये समन्वय, सामंजस्य दिसून येत नाही. चार दोन पाठीराखे आणि हाती पैसा असला की संघटन स्थापण्याची ऊर्मी भागवली जाते. या सर्व संघटनांमध्ये पारदर्शकता आणि लोकशाही मूल्ये खुंटीला टांगून केवळ एखादी व्यक्ती आजन्म सर्वोच्च पदाचा उपभोग घेत असते. कारण संघटन त्याने स्थापन केले असते. दुसऱ्या फळीतील कार्यकर्ते तयार व्हावेत असा प्रयत्न केला जात नाही. होतकरू कार्यकर्त्याला संधी दिली जात नाही. मुख्य म्हणजे पदे फिरती असत नाही. एकूण एकछत्री कारभार करण्याची प्रवृत्ती प्रामुख्याने दिसते. त्यातून व्यक्ती महात्म्य वाढीस लागते. परिणामतः लोक नव्याने जुळत नाही. नवीनता आणि कल्पकता यांचा अभाव संघटन पुढे नेण्यात जाणवतो. याची प्रचिती अलीकडेच बसपा या पक्षात झालेल्या घडामोडींवरून आली आहे. रिपब्लिकन नेते आणि पक्षाच्या तुलनेत बसपा काही भागात ठोस शक्ती म्हणून उदयास आली. पण ज्या गतीने ती झेपावली त्याच गतीने ती खाली आली, हे लक्षात येते. बहुजन समाज पक्षापासून ज्या अपेक्षा ठेवल्या गेल्या होत्या त्या कसोटीवर पक्ष खरा उतरला नाही हे अनेक उदाहरणांवरून स्पष्ट होते. आंबेडकरी विचारधारेवर स्थापन झालेल्या या पक्षाची आजची अवस्था आत्ममग्न नेतृत्व आणि एकाधिकारशाही यामुळे ओढवली आहे. महाराष्ट्र राज्यात पारंपारिक रिपब्लिकन पक्षापासून फारकत घेऊन अनेक मतदार त्यांच्या पाठीशी उभे राहिलेत. पैसा दिला. संघटन बांधणीसाठी वेळ दिली. काही भागात चांगली कामगिरी केली. पुढे मात्र मतदार निराश झाला आणि वाताहतच झाली. उत्तर प्रदेशात सत्ता मिळाल्यानंतर पक्ष नेतृत्वाला सत्तेचा कल्याणकारी समाज निर्मितीसाठी वापर करता आला नाही. आदर्श स्थापित करता आला नाही.

आजही उत्तर प्रदेशात खालच्या म्हणून गणल्या जाणाऱ्या जातीतील लोकांची अवस्था अतिशय बिकट आहे. वरिष्ठ जातींकडून शोषण आणि जाच यात फरक पडला नाही हे तिथे फिरून चर्चा करतांना सहज लक्षात येते. जातीय बलाबल प्रत्येक निवडणूक जिंकून देईलच याची खात्री देता येत नाही. मतदारांना काही कल्पक, सन्मानजनक हवे असते याचा अंदाज आत्ममग्न नेतृत्वाला आला नाही. सत्तेचा उपयोग वैयक्तिक भरभराट करण्यासाठी झाला. विविध वृत्तांतून याचे प्रत्यंतर येऊ लागले होते. पैशातून सत्ता सत्तेतून पैसा या चक्रात पक्ष अडकत गेला. त्यातून चौकश्यांचा ससेमिरा मागे लागला. पुढे पक्ष फरफटत गेला. विचारधारेपासून भरकटला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीत विरोधी पक्षाची भूमिका महत्वाची असल्याची मांडणी केली आहे. त्यामुळे सत्तेच्या बाहेर असताना विरोधी पक्ष म्हणून जी भूमिका घ्यायला हवी होती ती बसपा पक्ष पार पाडतांना दिसला नाही. विविध रिपब्लिकन नेते सत्तेच्या परिघात वावरण्यास प्राधान्य देतात. पद आणि सत्तेचा मोह असलेल्या आत्ममग्न नेतृत्वाला त्यांच्यापेक्षा अंतर्गत सरस नेतृत्व निर्माण होणे आवडत नाही हे राजकारणातील कठोर सत्य आहे आणि त्याला बसपा, आरपीआय आणि कोणतेही संघटन अपवाद नाही. ■ ■

– अनिरुद्ध कांबळे

“ सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे. ”



# महाबोधी महाविहार आंदोलन

## बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनाची ऐतिहासिक चळवळ

महाबोधी महाविहार, बुद्धगया, हे जागतिक वारसा स्थळ असून बौद्ध धर्मियांसाठी पवित्र स्थळ आहे. याच ठिकाणी भगवान गौतम बुद्धांना बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली, म्हणूनच हे स्थान बौद्ध धर्माच्या केंद्रस्थानी आहे. मात्र, या स्थळाच्या व्यवस्थापनावरून झालेल्या ऐतिहासिक आंदोलनाची कहाणी बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा महत्त्वाचा भाग आहे.

**महाबोधी महाविहारची पार्श्वभूमी :-** महाबोधी महाविहार ही जागा केवळ बौद्ध धर्मियांसाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवतेसाठी महत्त्वपूर्ण आहे. इ.स. 3 ऱ्या शतकात सम्राट अशोकांनी येथे प्रथम बौद्ध विहाराची स्थापना केली. पुढील अनेक शतकांत हे स्थळ बौद्ध भिक्षूंना साधनेसाठी आणि बौद्ध शिक्षणासाठी केंद्रबिंदू बनले. मात्र, मध्ययुगात भारतात बौद्ध धर्माची स्थिती कमजोर झाली आणि या पवित्र स्थळावर इतर धर्मांच्या प्रभावाने व्यवस्थापन हळूहळू बौद्धांच्या हातून गेले.

**महाबोधी महाविहार आंदोलनाची सुरुवात :-** 19व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि 20व्या शतकाच्या सुरुवातीला भारतात बौद्ध धर्म पुनरुज्जीवनाच्या दिशेने वाटचाल करत होता. श्रीलंकेचे बौद्ध नेते अनागरिका धर्मपाला यांनी या आंदोलनाची सुरुवात केली. त्यांचा मुख्य उद्देश हा होता की, महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्ध धम्मीय समाजाकडे असावे. धर्मपाला यांनी 1891 मध्ये 'महाबोधी सोसायटी' ची स्थापना केली. त्यांनी बौद्धगया येथे अनेक वेळा आंदोलन केले, न्यायालयीन लढाया लढल्या आणि जागतिक पातळीवर बौद्ध धर्मियांच्या पवित्र स्थळांसाठी आवाज उठवला.

**चळवळीतील संघर्ष आणि न्यायालयीन लढाई :-** महाबोधी महाविहार त्या काळात हिंदू महंतांच्या ताब्यात होते. त्यामुळे बौद्ध धर्मियांना या स्थळावर त्यांची धार्मिक प्रथा व परंपरा पार पाडण्यास अनेक अडचणी येत होत्या. अनागरिका धर्मपाल यांना अनेक वेळा स्थानिक सत्ताधाऱ्यांच्या विरोधाला सामोरे जावे लागले, परंतु त्यांनी हे आंदोलन शांततेने आणि दृढतेने चालू ठेवले. 1920 आणि 1930 च्या दशकात महाबोधी सोसायटीने मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली. परंतु, व्यवस्थापनावर पूर्ण नियंत्रण मिळवण्यासाठी बौद्ध समाजाला अनेक दशके वाट पाहावी लागली.

**महाबोधी महाविहाराची स्वतंत्र समिती :-** 1949 मध्ये स्वतंत्र भारत सरकारने 'महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायदा' (Bodh Gaya Temple Act) लागू केला. या कायद्यानुसार एक व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली, ज्यामध्ये ब्राम्हण आणि बौद्ध समाजाच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला. तथापि, बौद्ध धर्मियांच्या संख्येनुसार व्यवस्थापनात त्यांचा योग्य वाटा मिळावा, यासाठी अजूनही काही बौद्ध संघटना आवाज उठवत आहेत.

**आंदोलनाचे परिणाम आणि बौद्ध धर्म पुनरुज्जीवन :-** महाबोधी महाविहार आंदोलनाने जागतिक पातळीवर बौद्ध धर्माच्या पवित्र स्थळांप्रती असलेल्या भावनांना एकजूट केले. या चळवळीमुळे भारत आणि जगभरात बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनाला नवी चालना मिळाली. आजही बौद्धगया हे जागतिक बौद्धधर्मियांसाठी एक महत्त्वाचे तीर्थस्थान आहे. महाबोधी महाविहार आंदोलन केवळ एका धार्मिक स्थळाच्या व्यवस्थापनाची चळवळ नव्हती; ती बौद्ध धर्माच्या अस्तित्वाची, ओळखीसाठीची आणि आत्मसन्मानासाठीची चळवळ होती. अनागरिका धर्मपाल यांचे योगदान आणि बौद्ध समाजाचा सातत्यपूर्ण संघर्ष यामुळे हे आंदोलन इतिहासात अजरामर राहील. एकूणच या चळवळीमुळे बौद्धगया आज बौद्ध धर्मीयांसाठी श्रद्धेचे, ऐक्याचे आणि शांततेचे प्रतिक आहे. 2007 साली प्रवीण गांगुर्डे यांनी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवरील संयुक्त राष्ट्र समितीला अहवाल सादर केला तो अहवाल या ठिकाणी पाहणे अत्यंत महत्वाचे आहे तो पुढील प्रमाणे आहे. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवरील संयुक्त राष्ट्र समितीच्या कार्यालयाच्या अत्यंत आदराने, मी कलम 15-सांस्कृतिक हक्कांचा उपभोग याच्या उल्लंघनाकडे आपले लक्ष वेधून घेऊ इच्छितो. भारतातील आणि संपूर्ण जगामध्ये बौद्ध लोकांच्या सर्वात पवित्र स्थानावर, गैर-बौद्ध लोकांकडून भारतातील बिहार राज्यातील गया जिल्ह्यात वसलेले महाबोधी महाविहार आणि त्याद्वारे आमच्या सांस्कृतिक वारशाचा शांततापूर्ण आचरण करण्याचा आमच्या सांस्कृतिक अधिकारांचे उल्लंघन करणे चालू आहे. बुद्ध गया विहार म्हणून प्रसिद्ध असलेले महाबोधी महाविहार हे ते ठिकाण आहे जिथे सिद्धार्थ गौतम, राजकुमार यांना सर्वोच्च ज्ञान प्राप्त झाली आणि ते बुद्ध झाले. हा विहार सम्राट अशोकाने 250 BC याने भगवान बुद्धांच्या स्मरणार्थ स्मारक म्हणून उभारला होता. याची पुष्टी चिनी भिक्षू फा-हेन यांनी केली आहे ज्यांनी 409 ए डी मध्ये बुद्ध गयाला आणि 637 ए डी मध्ये ह्युएन त्सांग यांनी भेट दिली आहे. भारतीय बौद्ध आणि संपूर्ण बौद्ध समुदायासाठी जगातील सर्वात पवित्र स्थान असल्याने, या महाबोधी महाविहाराला भारत, चीन, जपान, बर्मा, थायलंड, श्रीलंका आणि इतर अनेक बौद्ध राष्ट्रांमधून लाखो लोकांनी भेट दिली




आहे. बौद्ध धर्माच्या या सर्वात महत्वाच्या ठिकाणाचे वर्णन युनेस्कोने उत्कृष्ट वैश्विक मूल्याचे स्मारक म्हणून केले आहे आणि त्यानंतर 29 जून 2002 रोजी जागतिक वारसा स्थळाच्या प्रतिष्ठित यादीत समाविष्ट केले आहे. सध्या, महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बोधगया मंदिर व्यवस्थापन कायदा 1949 मधील तरतुदींनुसार चालते. हा कायदा 1950 साली भारताची राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी लागू करण्यात आला होता. या कायद्याच्या कलम (3) च्या खंड (2) मधील तरतुदींनुसार, महाविहाराच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आणि कोणत्याही राज्याचे 8 सदस्य असतील. भारतीय आठ समिती सदस्यांपैकी प्रत्येकी चार महंत (मुख्य पुजारी) यांच्यासह बौद्ध आणि हिंदू असतील. त्याच कलमाच्या कलम (3) मध्ये म्हटले आहे की, गयाचे जिल्हा दंडाधिकारी हे समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतील, तर जिल्हा दंडाधिकारी हिंदू नसलेल्या कालावधीसाठी राज्य सरकार एका हिंदूला समितीचे अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करेल. या कायद्याच्या कलम (3) वरून हे स्पष्टपणे दिसून येते की बौद्ध समाजाला त्यांच्या पवित्र स्थळाच्या कारभाराचे व्यवस्थापन करण्यास स्वातंत्र्य नाही, कारण नऊ सदस्यांच्या व्यवस्थापन समितीमध्ये बहुसंख्य नेहमीच हिंदू असतील आणि बौद्ध सदस्य नेहमीच अल्पसंख्य राहतील.

**प्रवीण गांगुर्डे**
**मो. 9890631933**

भारतातील सर्व पवित्र धार्मिक संस्था, विशेषतः प्रार्थनास्थळे संबंधित अल्पसंख्याक समुदायाच्या सदस्यांद्वारे शासित किंवा व्यवस्थापित केली जात आहेत. भारतातील महाबोधी महाविहाराच्या विशालतेसह धार्मिक किंवा उपासना स्थळाचे एकही जिवंत उदाहरण नाही जिथे प्रशासकीय मंडळ किंवा व्यवस्थापन हे प्रार्थनास्थळ ज्या धर्माचे आहे त्या धर्माच्या प्रतिनिधींद्वारे सामायिक केले जात आहे. महाबोधी महाविहार हे कदाचित एकमेव उदाहरण आहे जे इतर धर्माच्या सदस्यांद्वारे नियंत्रित किंवा व्यवस्थापन केले जाते आहे. विहाराचे व्यवस्थापन केवळ भारतातील बौद्ध लोकांकडे सोपवण्याच्या गरजेकडे भारतातील बौद्ध समुदाय दीर्घ काळापासून बिहार राज्य सरकार तसेच केंद्र सरकारचे लक्ष वेधत आहे.

**शिफारसी :-** इतर धर्माच्या अनुयायांप्रमाणे बौद्धांनाही त्यांच्या सांस्कृतिक वारशाचा पूर्ण अधिकार मिळावा यासाठी भारताला पावले उचलण्याचे निर्देश दिले जाऊ शकतात आणि म्हणूनच बुद्धगया मंदिरात समान धार्मिक गटांद्वारे चालवल्या जाणाऱ्या इतर सर्व प्रमुख मंदिरांप्रमाणे बौद्ध प्रशासन असावे. (सर्व हिंदू मंदिरे हिंदू चालवतात, सर्व मुस्लिम मशिदी मुस्लिम चालवतात, सर्व शीख गुरुद्वारा शीख चालवतात.) 2) जपान भारतातील बौद्ध वारशाच्या संवर्धनासाठी लाखो डॉलर्सचा निधी देत आहे, परंतु बौद्ध संस्कृतीला त्या प्रमाणात प्रोत्साहन दिले गेले नाही. बौद्ध वारशाचा प्रचार करण्यासाठी भारताने आपल्या सल्लागार पॅनेलवर सुप्रसिद्ध, विद्वान बौद्ध भिक्खूंना आमंत्रित केले पाहिजे. दलित संस्कृती, दलित रंगमंच, नाटक हे दलित कलाकारांच्या कलागुणांसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कलात्मक संस्कृतीची भारताने काळजी घेतली नाही आणि संवर्धन केले नाही. ती हिंदूंना नाशिक येथील कुंभमेळ्यात सहभागी होण्यास मदत करते - हिंदू धार्मिक संस्कृती, रु. 330 दशलक्ष रुपये, तसेच हजारो मुस्लिमांना लाखो रुपये खर्चून पवित्र मक्का येथे वार्षिक यात्रेसाठी. 250 दशलक्ष, बौद्ध त्यांच्या लोककला, नाट्य कला, साहित्य कला इत्यादींसाठी नक्कीच समान वागणूक देण्यास पात्र आहेत.

या प्रकारे 2007 साली प्रवीण गांगुर्डे यांनी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवरील संयुक्त राष्ट्र समितीला अहवाल सादर केला होता. या अहवालवरून संयुक्त राष्ट्र संघाने भारत सरकारला या संदर्भाने काही महत्वपूर्ण सूचना दिल्या होत्या. त्याची कितपत अंमलबजावणी झाली हा वेगळा आभासाचा विषय होऊ शकतो. महाबोधी महाविहार आंदोलन केवळ एका धार्मिक स्थळाच्या व्यवस्थापनाची चळवळ नव्हती; ती बौद्ध धर्माच्या अस्तित्वाची, ओळखीसाठीची आणि आत्मसन्मानासाठीची चळवळ होती. अनागरिका धर्मपाल यांचे योगदान आणि बौद्ध समाजाचा सातत्यपूर्ण संघर्ष यामुळे हे आंदोलन इतिहासात अजरामर राहील. या चळवळीमुळे बौद्धगया आज बौद्ध धर्मीयांसाठी श्रद्धेचे, ऐक्याचे आणि शांततेचे प्रतिक आहे. भारत सरकारने आणि बिहार सरकारने महाबोधी महाविहाराचा प्रश्न लवकरात लवकर सोडवावा अशी मागणी सर्वत्र देशभरात होत आहे. ■■

---

## दानपेटी...

**अनंतायन**



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

तो त्या दानपेटीत दररोज पाच रुपये टाकायचा. त्याचे ते नियमित देवळात येणे, देवाला नमस्कार करणे आणि दानपेटीत पाच रुपये टाकणे तिथल्या विश्वस्तांच्या ध्यानात आले होते. त्याच्या साध्या कपड्यावरून व सायकलच्या वापरावरून तो निम्नवर्गीय गरीब भक्त आहे, हे सहज लक्षात येत होते. कधी कधी तो आपल्या बायकोला व एका मुलीला बरोबर घेऊन यायचा. तेंव्हासुद्धा कापूर, बुक्का, उदबत्ती न घेता पाच रुपये पेटीत टाकायचा. एखाद्या दिवशी नाही आला तर दुसऱ्या दिवशी दहा रुपये पेटीत न चुकता पडायचे. त्याच्या या नित्यक्रमात कधी खंड पडल्याचे तिथल्या पुजाऱ्याने आणि विश्वस्तांनी पाहिले नव्हते. त्यामुळे तो आदराचा विषय झालेला होता.अशी वीस वर्षे संपली. महागाई किंवा उत्पन्नातील वाढ याचा त्याने आपल्या दानपेटीतील पाच रुपयात कधी बदल केला नाही किंवा वाढ केली नाही. आता तर रस्त्यावर लहानमोठे सर्व स्कुटर, मोटार सायकल घेऊन दिमाखात येत व ऐटीत निघून जात. मात्र त्याच्या सायकलीवरून येण्याजाण्यात कधी फरक पडला नाही. सध्या त्याचे आयुष्य थोडे ओढग्रस्त असावे असे जाणवत होते. तरीही दानपेटीतील पाच रुपयांचा नित्यक्रम त्या गरीबाने चुकविला नाही. त्याची मुलगी मोठी झाली होती व कदाचित तिची काळजी त्याला सलत असावी. कधी कोणाजवळ बोलला मात्र नाही. त्याला देवळाच्या ओट्यावर शून्यात नजर लावून बसलेला अनेक वेळा त्या विश्वस्तांनी पाहिले देखील. मात्र हा आपणहून कोणाशी बोलत नसे किंवा आपले दुखडे सांगत नसे. सध्या तो जास्तच चिंताक्रांत दिसत होता. एके दिवशी देवळाच्या विश्वस्तांनी हिय्या केला व आपुलकीने त्याला विचारले की सध्या असे चिंताक्रांत का असता? तुमचे काम सुटले आहे काय? कसली चिंता भेडसावत आहे? तो कसनुसे हसला. बोलला, `कांही नाही हो, मुलीचे लग्न ठरलेय व पैशाची जोडणी कांही झालेली नाही. स्थळ चांगले आहे. हातचे जाऊ नये असे वाटतेय. पण आता हात तरी कोणाकडे पसरायचे? मी हा असा पैशाने दुबळा. कामाचा मालकही फारसे कांही उचलून द्यायला तयार नाही. म्हणून काळजीत आहे, उतकेच. बघू देव यातून कसा काय मार्ग काढतोय ते?`' अरे पण खर्च तरी किती आहे?' विश्वस्त.पंचवीस-तीस हजार तरी नक्की लागणार हो.' तो.त्या दिवशी काय झाले कुणास ठाऊक. त्या विश्वस्ताच्या डोक्यातून तो विषय काही जाईना. रात्री झोपतानाही त्याचाच विचार. रात्री वरचेवर जाग आल्यामुळे झोपदेखील नाही झाली. पहाटे त्याला एक स्वप्न पडले. स्वप्नात पाच रुपयांची नाणी तो मोजत होता. जागा झाला व स्वप्न जसेच्या तसे त्याला आठवू लागले, खाऊ लागले. त्याने देवाकडे पाहिले. तो चोरासारखा बेरकी हसत असलेला त्याला दिसला. तो पटकन उठला. वही घेतली व हिशोब करू लागला. एकूण वर्षे वीस. एकूण दिवस 7300/- दररोज रुपये पाच ने झाले 36500/-. त्याने 36500/- ची एक थैली तयार केली व शांतपणे झोपी गेला. झोपेत पुन्हा तेच स्वप्न! तो जागा झाला व आठवू लागला. पाच रुपयांची नाणी आपण मोजत होतो हे स्वच्छपणे त्यास आठवले. दानपेटीतील जमा पैसे आपण फिक्स डिपॉझिट ठेवतो हेही त्यास आठवले. त्यांनी हिशोब केला. सरासरी जमा रुपये 18250/- वर्षाचे अंदाजे व्याज 2000/-. वीस वर्षांचे झाले 40000/- म्हणजे सरळ व्याजाने त्या गरीबाच्या दररोजच्या पाच रुपयांचे मुद्दलासह होतात रुपये 76500/- आणि हा चिंताक्रांत आहे पंचवीस हजारासाठी!तो विश्वस्त आता निश्चिन्त झाला होता. त्याने देवाच्या तिजोरीतून शहात्तर हजार पाचशेची थैली तयार करून ठेवली. आता त्यास शांत झोप लागली. नेहमीप्रमाणे दुसऱ्या दिवशी तो गरीब देवळात आला. त्याने देवाला नमस्कार केला. तिथल्या दानपेटीत रुपये पाच टाकले व ओट्यावर जावून बसला. तो विश्वस्त देवळातील आणखी काही सज्जनांना घेऊन तिथे आला व त्याने ती थैली त्या गरिबाला दिली. सांगितले, `बाबा रे, तू दररोज देवाला पाच रुपये प्रमाणे या वीस वर्षांत 36500/- रुपये वाहिलेस. वीस वर्षांत त्याचे 76500/- रुपये झालेत, जे देवाकडे सुरक्षित आहेत. आज तुझी नड आहे व देवाची इच्छा आहे की ते तुला उपयोगी पडू देत. म्हणून तुझे पैसे तू मोजून घे!'गरीब चकित झाला. त्याला दिवसा उजेडी जणू कांही मोठे स्वप्न पडले होते. तो ती थैली घेऊन देवाजवळ गेला व रडू लागला. सर्वजण खूप भावूक झाले. देव प्रसन्न हसत होता. गरीबाचा पाय देवळाबाहेर निघत नव्हता. तो मात्र थैली घेऊन तिथेच बसून राहिला. त्याची पत्नी व मुलगी त्याला शोधत देवळात आली. त्याने घडलेले वर्तमान त्या दोघींना सांगितले. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. बघणारे सर्वजण देवाचा जयजयकार करू लागले. आता पत्नी व मुलगी त्याला घरी चला असे विनवू लागली. पण त्याचा पाय तिथून निघत नव्हता. माझे दान देवाने परत तर नाही ना केले? असे त्याचे मन त्यास खाऊ लागले. काय करावे त्याला सुचेना. त्याने विश्वस्तांना बोलावले व मी जे देवाला पाच रुपये वाहिले त्याचे वीस वर्षात किती होतात असे विचारले. त्यांनी सांगितले की 36500/- होतात. गरीबाने थैलीतील 36500/ रुपये काढले व पुन्हा त्या दानपेटीत टाकले. आता त्याच्या चेहऱ्यावरील ताण नाहीसा झाला. सर्व उपस्थित चकित झाले. त्यांनी त्याला विचारले की हे तू काय केलेस? तो बोलला, `मी देवाला जेवढे वाहिले तेवढे परत करतोय. तो माझ्यासाठी देवाला मी दिलेला नैवद्य होता. उद्याचा माझा पाच रुपयांचा नैवद्य आता मी निश्चिन्त मनाने देवास वाहीन. अन्यथा माझ्या येणाऱ्या रात्री मी तळमळत काढल्या असत्या. आता मला शांत झोप लागेल. देवाने दिलेल्या या उरलेल्या पैशात माझ्या मुलीचे लग्न थाटामाटात होईल. आता मी घरी जातो आहे आणि प्रसन्न चेहऱ्याने ते कुटुंब घरची वाट चालू लागले. देवाचा प्रसन्न चेहरा मात्र आणखी उजळला होता! थेंबाथेंबाने देवाकडे आपण साठविलेली कोणतीही गोष्ट; मग ते पैसे असोत, उपासना असो किंवा देवाचे आशीर्वाद असोत, कालांतराने अशी महाकाय होत असते व आयुष्यातील कठीण वेळ सहज दूर करते !आपण नि:स्वार्थपणे केलेले कुठलेही सत्कार्यकधीच वाया जात नाही. केव्हा ना केव्हा आयुष्याच्या कुठल्यातरी टप्प्यावर ते तुम्हाला कामी येते. ■■

बहुजन सौरभ

---

# सरकारच्या तिजोरीवर नेमका कोणाचा अधिकार ?

*नुकताच पार पडलेला कुंभमेळाव्यात सरकारने चक्क साडे सात हजार करोड रुपये लावले. केवळ हिंदू धर्माच्या एका कार्यक्रमासाठी सरकारची तिजोरी खाली होत असेल तर, बाकीच्या कायक्रमासाठी किती खर्च करणार हा प्रश्न निर्माण होतो? म्हणजे सरकारच्या पैशावर केवळ एकट्या हिंदू धर्माचाच अधिकार आहे का?*




एका धर्मासाठी एवढे पैसे खर्च केले जातात? मग आता 14 एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती येत आहे, त्यासाठी सरकार किती खर्च करेल? अनेक महापुरुषांच्या जयंती आहेत त्यावर सरकार खर्च किती करतो? भारतात अनेक जाती धर्माचे कार्यक्रम जयंती उत्सव होत असतात, त्यांचे विचार पुढे नेण्यासाठी सरकार काय काय उपक्रम राबवीतो? हा खूप मोठा प्रश्न निर्माण होतो? आज देशात एवढी महागाई, बेरोजगारी वाढलेली आहे परंतु सरकारचे त्याकडे लक्ष नाही असे दिसून येते.

दलित, मुस्लिम, आदिवासी समाजातील लोकांना देशातून बाहेर तर काढत नाही ना? असे जर असेल तर फक्त एकाच जातीचा हा देश नाही आणि एकाच जातीची मक्तेदारी नाही? सरकारने आपल्या धोरणात सुधारणा केली पाहिजे? भारत हा अनेक जाती-धर्माचा देश आहे. आणि अनेक जाती धर्माचे लोक इथे गुना गोविंदाने राहत असून, जातीय दंगली घडवून आणणे हा योग्य प्रकार नाही? त्याला कुठेतरी आळा घालायला पाहिजे. भारतात बेरोजगारीचे प्रमाण वाढले. युवा वर्गाला नोकरी नाही. मुलांच्या शिक्षणातून त्यांचा आरक्षण कमी करीत आहेत. त्यांचे स्कॉलरशिप संपुष्टात आणत आहेत, त्यांना हेल्थ इन्शुरन्स नाही, हे काय चालले? सरकारची एक प्रकारची मनमानी आहे की काय असे वाटायला लागले? एकीकडे एका धर्मासाठी साडेसात हजार कोटी रुपये खर्च कुंभमेळ्यात खर्च होतात? मग भारतात अनेक जातीधर्माचे लोक आहेत, तर त्याच्यावर सरकार एवढा किंवा त्याच्यापेक्षा जास्त खर्च करेल का? की शेवटी जातीच्या आधारावर भेदभाव करेल? कारण त्यांच्या अधिकाऱ्यावर, स्कॉलरशिपवर, शिक्षणावर, हेल्थ इन्शुरन्स वर सरकार पैसा खर्च करत नाही आहे. सरकार त्याकडे अजिबात लक्ष देत नाही? असे कुठे ना कुठे वाटायला लागल? असे जर होत असेल तर, आपल्या अधिकारासाठी रस्त्यावर येऊन आंदोलन, मोर्चा काढून लढा द्यावा लागेल. आम्ही आमच्या मागण्या साठी रस्त्यावर उतरलो तर त्याला कुणीही अडवू शकणार नाही. कुणाच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा प्रयत्न करू नये आणि तसला दबाव पण टाकू नये. 12 फेब्रुवारी पासून महाबोधी बुद्ध विहार बौद्ध गया येथे 1949 हा कायदा रद्द करण्यासाठी भंतेजी शांतीपूर्वक उपोषण करीत आहेत. त्याचा पडसाद संपूर्ण भारतभर पडलेला दिसून आला आणि त्यासाठी गावागावातून, शहराशहरात, प्रशासना विरुद्ध 1949 ॲक्ट रद्द करण्यासाठी आंदोलन सुरू आहेत. आज पर्यंत कुठल्या मज्जिद मध्ये, मंदिरामध्ये, चर्चमध्ये, गुरुद्वारामध्ये त्यांच्या कमिटीवर बुद्धिस्ट लोकांना घेण्यात आलेले नाही. मग तुम्ही जेव्हा त्यांना आपल्या कमिटीत घेऊ शकत नाही तर बुद्धिस्टांचा महाबोधी विहार बुद्धगया येथील बुद्धिस्ट लोकांच्या ताब्यात का देत नाही? आतापर्यंत जवळजवळ बरेच कायद्यामध्ये बदल झाले परंतु 1949 ॲक्ट मध्ये आतापर्यंत बदल करण्यात आलेला नाही? आमचे आम्हाला परत घेण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या अधिकारानुसार, कायद्याच्या चौकटीत राहून, तथागत भगवान बुद्धांनी दिलेल्या तत्त्वानुसार, शिकवणीनुसार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून, मोर्चा आंदोलन करून, आम्हाला आमचे हक्क, अधिकार मागण्यासाठी, रस्त्यावर उतरायला कुणीच अडवू शकणार नाही. प्रत्येक गोष्ट आम्हाला जर लढून झगडून मागायची असेल तर त्या अधिकारासाठी ऐक्याने रस्त्यावर उतरू आणि ते करावंच लागेल. सरकारला त्यांची मनमानी करू देणार नाही. यासाठी सरकारला जनतेने निवडून दिलेले नाही की केवळ एकाच जाती धर्मासाठी सरकार, सरकारच्या तिजोरीतील पैसा खर्च करेल? हे बाकीच्या समाजावर अन्याय झाल्यासारखे होईल? आणि हे अन्याय कुठल्याही समाज बांधवांनी सहन करायचे नाही. प्रत्येकाला अधिकार आहे तशी संविधानात अधिकारीतरित्या कायद्याने तरतूद केलेली आहे. मग आपण का सहन करायचा? आपला तो अधिकार आहे? आणि तो आपला अधिकार आपल्याला मिळालाच पाहिजे? त्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला पाहिजे? ■■



ज्योत्सना बनसोड
मो. 8766942982

---

# सेवानिवृत्त जीवलगा...

**मित्रवर्य बाबा बिडकर आज नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहे. सेवेत प्रविष्ट आणि सेवानिवृत्ती या दोन घटनांच्या दरम्यान उमेदीचा काळ निघून जातो. सेवेत अनेक आव्हानात्मक कार्य करत असताना यशाची अनेक शिखरे सर केलेली असतात. कधी अगदी मनमुराद आनंददायी तर कधी ताणतणाव ओढाताण अशा अनुभूतींची शिदोरी सोबत घेऊन एकामागून एक दिवस महिने वर्षे सरत जातात.**

पन्नाशीची चाहूल लागली तरीही पुढची वाट चालत असताना पाय थकू लागतात आणि आता आपण थोडे थांबून घ्या! अशी साठीच्या भेटीआधीची वृत्ती सेवानिवृत्तीस खुणावत जाते आणि शेवटी सेवानिवृत्तीचा दिवस उजाडतो. सेवानिवृत्तीनंतर, जी महत्त्वाची कर्तव्य राहून गेलीत... चांदण्यात भिजायचे राहून गेले... सेवानिवृत्त जीवलगा!

अशा विशेष ध्येयासाठी सेवानिवृत्तीनंतरचे आपले आयुष्य, ज्याला अलिकडे सेकंड इनिंग म्हणतात, सुखी समाधानी यशस्वी निरामय जावो तथा आपले ईप्सित साध्य होवो!



अनुज हुलके,
मो. 9823883541

बाबा बिडकर हे सर्वसाधारण शेतकरी कुटुंबातील. शाळेचा उंबरठाही न ओलांडलेल्या आईवडील आणि बहिणी अशा गोतावळ्यात अत्यंत संघर्षमय जडणघडण होत बालपणीच अभ्यासात लौकिक मिळवला. वडीलधाऱ्या शिक्षकांनी शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन दिले. पण व्यावसायिक शिक्षण घेऊन कौटुंबिक उदरनिर्वाहासाठी सहाय्य व्हावे यादृष्टीने शिक्षकाची नोकरी धरली आणि कुटुंबाचा आधार बनून अनेक जबाबदाऱ्या पेलल्या.

प्राथमिक शिक्षक म्हणून काम करत असताना अलिकडे विविध प्रकारच्या भूमिका वठवत सेवा द्यावी लागते. दाई पासून तर आई पर्यंत आणि शाळेच्या मुखीयापासून तर शिपायापर्यंत अशा भूमिकेत अक्षरक्षः बहुरूपी होऊन सादर व्हायचे असते...




भरीस भर अध्यापन, प्रशिक्षण, शालेय व्यवस्थापन, कार्यालय वरीष्ठ अधिकारी यांच्याशी समन्वय -कार्यपूर्ती, विद्यार्थी पालक समाज यांच्याशी सुदृढ संवाद साधत राहणे ...

इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत गणित, भाषा, इंग्रजी, परिसर अभ्यास, कला कार्यानुभव शारीरिक शिक्षण इत्यादी आणि हिंदी, विज्ञान, इतिहास भूगोल असे विषय अध्यापन, शालेय व्यवस्थापन अशी विविध प्रकारची कार्ये करण्याचे कसब वापरुन शिक्षक आपली सेवा कसदार बनवतात. त्यात कसलीही कसर राहू नये या मनीषेसह आपल्या मुख्य कर्तव्याचा भाग म्हणून विद्यार्थी हा शिक्षणापासून तसूभरही दूर जाऊ नये ही काळजी घेत, जमिनीवरील ताऱ्यांना प्रकाशमय करणे हेच ध्येय उराशी बाळगून ठेवले. त्यामुळे उत्तमोत्तम विद्यार्थी घडवून ज्या गावात नोकरी केली तिथे आपली अन्योन्य छाप सोडली. जीवलगा!... जीवलगा!

या सर्व व्यापातूनही सामाजिक उत्तरदायित्त्व आणि सामाजिक कर्तव्याची जाण ठेऊन समाजशिक्षक होता येते, हे आपल्या कृतीतून दिसून येते. अभ्यासक्रमाची तत्वे, गाभाघटक, शिक्षण व्यवस्था, भारतीय समाज व्यवस्था आणि शैक्षणिकदृष्ट्या माघारलेले समाज घटक, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण यांचे चिकित्सक अध्ययन करुन निरंतर चिंतन मनन प्रक्रियेतून विश्लेषणात्मक लेखन करणे हे फार महत्त्वाचे काम आपल्या हातून होऊ शकले. शिक्षण प्रक्रियेत महत्त्वपूर्ण घटक शिक्षक. शिक्षकांना शैक्षणिक चळवळीचे भान देणे ही खूप आवश्यक बाब ठरते.

सत्यशोधक शिक्षक प्रबोधिनी द्वारे शिक्षकांची शिबिरे आयोजित करण्यात आपला महत्वाचा वाटा राहिलेला आहे. त्यामुळे अनेक शिक्षकांमध्ये शैक्षणिक ऐतिहासिक जाणिवा निर्माण होऊन शिक्षक प्रबोधन चळवळीकडे वळता होऊ लागलेला आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारामुळे महाराष्ट्र पुरोगामी म्हणून नावारूपाला आलेला आहे. स्त्रीशुद्रातीशुद्रांचे आमुलाग्र जीवन बदलून जावे यासाठी, सत्यशोधक चळवळीचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान राहिलेले आहे. अलिकडे मंडल आंदोलन, मंडल नंतरच्या काळातील ओबीसी लढे, सत्यशोधक समाजाची अधिवेशने, सत्यशोधकी साहित्य संमेलनातून आणि सत्यशोधकी विचारप्रवाह विद्रोही साहित्य संमेलनाच्या भव्य आयोजनातून लोकचळवळीचे रुप धारण करीत आहे. या विचार प्रवाहात आपण एक पथिक असल्याचा अत्यानंद आहे.

जे जे आपणासी ठावे, ते इतरांशी सांगावे.

या उक्तीप्रमाणे मित्र सहकाऱ्यांशी संवाद साधून नवनव्या व्यक्तींना जोडणे हे संघटनात्मक कार्य जिकरीचे आहे आपण लीलया साध्य करता. आणखी जोमाने भविष्यात ते साध्य करता येईल. त्यादृष्टीने आपला सेवानिवृत्तीनंतरचा काळ फार बहुमोलाचा असेल. आपला मनोदय पूर्ण होवो यास्तव सेवानिवृत्तीच्या निमित्ताने मनापासून हार्दिक मंगलकामना,

सेवानिवृत्त जीवलगा! ■■

---

# भीमवाडीच्या प्रवासी : संघमित्रा गेडाम

*गाव आंबेडकरी चळवळीचे जयभीमचे जनक बाबू हरदास एल.एन. यांचे कामठी जि. नागपूर, माझ्या जन्माअगोदर जातीयतेच्या विरोधात तिथे त्यांनी संघर्ष केला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेल्या अनेक लढ्यात माझ्या गावातील लोकांचा मोठा सहभाग होता. आंबेडकरी चळवळीतून सामाजिक संघर्षात उतरलेले गाव आहे. असे ऐतिहासीक पार्श्वभूमी असलेले माझे कामठी गाव.*

माझा जन्म खूप नंतरचा गावच आंबेडकरी चळवळीचे, आजोबा, मोठे वडील आणि माझे वडील यांच्या सानिध्यात, वातावरणात वाढ झाल्यामुळे बालपणापासूनच चळवळ बघत आले. धम्म आणि समाजकारण याची ओळख, पुढाऱ्यांची भाषणे, जलसे, गायन पार्ट्या, यातूनच आंबेडकरी विचार आणि चळवळीचे संस्कार माझ्या घरातूनच माझ्यावर झाले. कारण माझे घरचे आंबेडकरी विचाराने भारावलेले होते. आंबेडकरी ऊर्जाचे घरातूनच बाळकडू म्हणून मिळाले. माझे वडील स्मृतीशेष जयदेव कचरुजी अंधारे एकनिष्ठ आंबेडकरवादी होते. तसेच माझी आई सुद्धा बौद्ध धम्म संस्काराची उपासिका होती. त्यामुळे घरातील संपूर्ण वातावरण आंबेडकरवादी धम्ममय असल्याने माझ्या बालमनावर आंबेडकरी विचार व संस्कार रुजले, तसेच माझे गेडाम कुटुंबिय बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारेचे असल्याने आंबेडकरी विचारधारा अंगिकारून बुद्ध, धम्म आणि संघ या धम्मपथाने मी मार्गक्रमण करू लागले. याचा मला अभिमान आहे. माझे वडील जयदेव अंधारे शासकीय नोकरी करीत असताना माझ्या आई वडिलांनी आमच्यावर जे संस्कार केले ते आजही मी माझ्या काळजात जपून ठेवले आहे. याच मुळे आज आम्ही बोधीवृक्षाच्या शीतल छायेखाली पांथस्थ आहोत.

आमच्या कामठी येथे बाबू हरदास एल.एन. यांच्या नावाने हरदास नगर आहे, येथेच हरदास हायस्कूल सुद्धा आहे. या हायस्कूलचे सेक्रेटरी सुद्धा माझे वडील होते. तसेच याच परिसरात म्हणजे हरदास नगरात बुद्ध धम्माचे संस्कार समाजमनावर व्हावे व आंबेडकरी चळवळ गतिमान व्हावी म्हणून माझ्या आजोबांच्या व येथील आंबेडकरी विचारधारेच्या उपासकानी हरदास बुद्ध विहाराची स्थापना केलेली आहे. नंतरच्या काळात या हरदास बुद्ध विहाराचे अध्यक्ष म्हणूनसुद्धा माझ्या वडिलांनी कार्यभार सांभाळेला आहे. या विहारातूनच बाबू हरदास एल.एन. यांच्या जीवनकार्याविषयी एक पुस्तिका निर्माण करण्यात आली. या पुस्तिकेचे लेखन भानुदास मेश्राम यांच्यासह अनेक बौद्ध उपासकांनी पुढाकार घेऊन जयभीमचे जनक बाबू हरदास एल.एन. यांच्या जीवन विषयीच्या कार्याला उजाळा मिळाला. यासाठी माझे आजोबा, मोठेबाबा यांचाही सहभाग होता. याचा माझ्या सारखीला अभिमान वाटतो.

माझे वडील आंबेडकरी चळवळीशी एकनिष्ठ असल्याने आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी त्यांची धडपड असायची. मुळात ते प्रतिभावंत असल्याने त्यांना लेखन, वाचन करण्याची प्रचंड आवड होती म्हणून त्यांनी कविता, लेख खूप लिहिलेले आहेत. तसेच हिंदी, मराठी शेरो शायरी यात त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या या लेखन वाचनामुळे आमच्या घरात एक ग्रंथालय निर्माण झाले होते. यामध्ये बौद्ध धम्म व फुले, शाहू, आंबेडकर विचारधारेचे पुस्तके खूपच संग्रहित झाली होती. या पुस्तकांचा संग्रह हा ऐतिहासीक होता. त्या काळात आमच्याकडे मूकनायक, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत हे येत असत. हे या ग्रंथ संग्रहामधून आम्हाला दिसून येते. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन यांनी मूकनायक व बहिष्कृत भारतातील अग्रलेख खंड एक अंक क्रमांक दहा हा कामठी, नागपूर येथील जयदेव कचरुजी अंधारे यांच्या कडून डॉ. आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूट नागपूर यांना 1977 साली मिळाला व तिथूनच तो मा. वसंत मून




मो. 7709040082

साहेब यांनी प्राप्त केला. म्हणजे माझे वडील जयदेव कचरुजी अंधारे यांच्या नावाचा या मध्ये उल्लेख आहे. याचा आम्हाला प्रचंड अभिमान वाटतो.

माझे बी. ए. पर्यंतचे शिक्षण कामठी येथेच झाले. या नंतर माझे लग्न झाले. लग्न झाल्यानंतर माझे शिक्षण सुरूच ठेवले. मी एम. ए. समाज शास्त्र या विषयात पूर्ण केले. तसेच या काळात नव्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा म्हणजे आंबेडकर थॉटस् हा अभ्यासक्रम आल्याने या विषयात सुद्धा मी एम. ए. पूर्ण केले. यासाठी माझ्या कुटुंबियांचे मला मोलाचे सहकार्य मिळाले. म्हणूनच मी पुढील शिक्षण घेऊ शकले.

शालेय, महाविद्यालयात शिक्षण घेत असताना मला वाचनाची लेखनाची आवड असल्याने महाविद्यालयाच्या वार्षिक अंकामध्ये माझ्या कविता, लेख छापून यायच्या. यावेळी मला खूपच आनंद वाटायचा. कालांतराने मी वर्तमानपत्र, साप्ताहिक, मासिकातून लिहायला लागले.

लेखनाची आवड घट्ट होत असल्याने माझे साहित्य पुस्तक रूपाने यावे असे नेहमीच मला वाटायला लागले होते. त्यामुळे आम्ही मैत्रिणी नागपूर समूहाच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी 125 महिलांनी इंग्रजी, मराठी, हिंदी आणि इतर बोली भाषेतून 'कविता भीमाच्या' हा ऐतिहासिक काव्यसंग्रह 2016 या वर्षी प्रसिद्ध केला. यासाठी मैत्रिणी नागपूर समूहातील सर्व मैत्रिणींनी सहकार्य केले. आमचा मैत्रिणी नागपूर हा आंबेडकरी विचारधारा जोपासणारा महिलांचा समूह असून आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी धडपडत असतो. या मधूनच आम्ही प्रत्येक पौर्णिमेला वेगवेगळ्या बुद्ध विहारात जाऊन बावीस प्रतिज्ञा आणि भारतीय संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करतो. सामाजिक परिवर्तनात आमचाही खारीचा वाटा असावा या उद्देशाने आम्ही सर्व मैत्रिणी कार्य करीत असतो. या माध्यमातूनच मला बावीस प्रतिज्ञा वर कविता सुचल्या म्हणून मी प्रत्येक प्रतिज्ञावर कविता करून 'कवितामय बावीस प्रतिज्ञा' नावाचा काव्यसंग्रह बोधीपर्ण प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद येथून प्रकाशित झाला. वाचकांच्या प्रचंड मागणीमुळे पहिली आवृत्ती संपली. आता द्वितीय आवृत्ती प्रकाशनच्या वाटेवर आहे. यासाठी मला प्रख्यात कवी तथा समीक्षक देवानंद पवार यांचे सहकार्य लाभले. तसेच 'अस्मिता' हा माझा काव्यसंग्रह सुद्धा समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर यांनी प्रसिद्ध केला. आंबेडकरी चळवळ गतिमान व्हावी हाच माझा उद्देश असून लवकरच बाबू हरदास एल.एन. यांच्या जीवन कार्याची गौरव गाथा निवडक कवींच्या कवितामधून ऐतिहासीक दस्तऐवज निर्माण व्हावा म्हणून मी 'जयभीम' या नावाने काव्यसंग्रह संपादित करीत आहे.

या माझ्या सर्व कार्याची दखल म्हणून महाराष्ट्र भरातून माझ्या लेखन कार्याला विविध पुरस्कार मिळालेले आहेत. तसेच मला इथे आवर्जून सांगावेसे वाटते की 'फुले - आंबेडकर वांङ्मय कोष' संपादक डॉ. महेंद्र भवरे यांनी संपादित केलेल्या लेखकांच्या कोषात माझी नोंद प्रा. देवानंद पवार यांनी घेतलेली आहे. याचा ही प्रचंड आनंद मला आहे. रमाई धम्मसृष्टी स्मारक समितीच्या मार्गदर्शक म्हणून माझ्या साहित्याला या समितीने 'राजरत्न उत्कृष्ट वांङ्मय पुरस्कार' देऊन माझा सन्मान केलेला आहे. या सर्व जडण घडणीत माझ्या आई-वडील यांच्यासह माझा गेडाम परिवार माझ्या पाठीशी भक्कमपणे उभा असल्याने मी धम्म चळवळ व आंबेडकरी चळवळीत सक्रिय आहे. यामुळेच मला भीमवाडीच्या प्रवासी म्हणून बोधीपर्ण प्रकाशनने संबोधिले आहे. ■■

**शब्दांकन : करूणा पवार**
**संकलन : प्रज्ञा मेश्राम**

## महत्वाचे

### 94 व्या शहीद दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**नागपूर :** 24 मार्च रोजी, निमाद्वारे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय येथे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर व राष्ट्रीय सेवा योजना, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या 94 व्या बलिदान दिवस प्रित्यर्थ सोमवारी 24 मार्च रोजी सकाळी 10 ते 3 यावेळेत वार्ड क्र. 3, शल्यतंत्र विभाग येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले आहे. शिबिराचे उद्घाटन शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र सोनेकर यांच्या शुभहस्ते संपन्न होईल. या कार्यक्रमाला डॉ. रवींद्र बोथरा, डॉ. प्रवीण डांगोरे, डॉ. मृण्मयी मासोदकर, डॉ. पंकज भोयर, डॉ. राहुल राऊत डॉ. मोहन येंडे, डॉ. मीनाक्षी सराटकर, डॉ. नितीन कानोलकर, डॉ. शरद ठाकूर, डॉ. पंकज थूल, डॉ. विना फाये, डॉ. ममता रेवतकर, डॉ. वैशाली चरडे, डॉ. शांतीदास लुंगे, डॉ. गणेश टेकाडे, डॉ. आशिष राणा, डॉ. कल्पना चव्हाण, डॉ. वंदना शिंदे, अविनाश देशपांडे प्रामुख्याने उपस्थित राहतील. शहीद दिवसाचे महत्त्व समजून संघटनेने रक्तदान संकल्पना सामाजिक बांधिलकी म्हणून पूर्ण करून आपली समाजा विषयीची जबाबदारी पूर्ण करावयाची आहे. या कार्यक्रमाला यशस्वीतेसाठी डॉ. शैलेंद्र अग्रवाल, डॉ.विकास चीटमुलवार, डॉ. मनीष भोयर, डॉ. सुमती जैन, डॉ. दिलीप फाये, डॉ. हुसेन, डॉ. मेश्राम, डॉ. राजू कोसे, डॉ. विनोद गंभीर, डॉ. तुरनकर, डॉ.विवेक येवले, डॉ. शेखर तनमने, डॉ. आलम आदी प्रयत्नशील आहे.

### पाठलाग करणाऱ्या पोलिसांच्या वाहनाला लाथ मारली, एका पोलिसाचा मृत्यू




**बुलढाणा :** दारूची अवैध वाहतूक व विक्री करणाऱ्या व्यक्तीने आपला पाठलाग करणाऱ्या पोलिसाच्या दुचाकीला लाथ मारल्याने झालेल्या विचित्र अपघातात एका पोलिसाचा जागीच मृत्यू झाला. त्यांचा सहकारी पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाला आहे. त्याला नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपराध्याचे मनोधैर्य किती वाढले याचे ज्वलंत उदाहरण ठरलेल्या या घटनेने जिल्हा पोलीस दल अक्षरशः हादरले आहे. जिल्ह्यात अवैध दारू विक्रेत्यांची हिंमत चांगलीच वाढली आहे. त्यातील बहुतेक जणांना प्रभावी 'आका' चे, कधी राजकारण्याचे पाठबळ असते. विविध कारणामुळे त्यांचे मनोधैर्य कमालीचे वाढल्याचे, त्यांची हिम्मत, अरेरावी वाढल्याचे दिसून येते. दुसरीकडे पोलिसांचे मनो धैर्य, दरारा विविध कारणामुळे कमी झाल्याचे दिसून येत आहे.

### देऊळगाव महीमध्ये अग्नी तांडव



**बुलढाणा :** देऊळगाव राजा तालुक्यातील आणि राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या देऊळगाव मही येथे रविवारी लागलेल्या भीषण आगीत चार दुकानातील विविध साहित्याची मोठी हानी झाली. या भीषण दुर्घटनेत तीस ते पस्तीस लाख रुपयांचे नुकसान झाले. घटनेने जबर मानसिक धक्का बसलेल्या एका दुकानदाराची प्रकृती बिघडली. दुकान ओळीतील चिखली- जालना मार्गावर संदीप किराणासह अन्य तीन दुकानाला आज 23 मार्च रोजी रविवारला अचानक भीषण आग लागली.या आगीत लाखों रुपयांचे नुकसान झाले आहे.ही शॉटसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. या आगीच्या घटनेमुळे स्थानिक नागरिकांची एकच तारांबळ उडाली होती. शिवाजी विद्यालया समोर विजय श्रीराम शिंगणे यांच्या मालकीचे संदीप होलसेल व चिल्लर विक्रीचे किराणा दुकान आहे. संजय पऱ्हाड यांचे फायबर फर्निचर दरवाजे विक्रीचे दुकान तसेंच शेख. नसीम यांचे सायकल स्टोअर व सुनिल शिंगणे यांचे गोळ्या बिस्कीट अंडे, पाणी होलसेल विक्रीचे दुकान आहे. संदीप किराणा दुकानासह अन्य तीन दुकानें लागूनच असल्यामुळे कुठल्यातरी एका दुकानात शॉट सर्किट झाले असावे असा अंदाज आहे. हळू हळू आगीने पेट घेतल्याने आग पसरली. भीषण आगीत रूपांतर होऊन काही क्षणातचे होत्याचे नव्हते झाले.चारही दुकानातील किराणा माल, नव्या जुन्या सायकल, टायर, ट्यूब मोटार सायकल टायर ट्यूब रिंगा फर्निचर दरवाजे, गोळ्या बिस्कीट पाणी बॉटल यासह अनेक साहित्य जळून खाक झाले आहे. याप्रसंगी आग विझविण्यासाठी पाण्याच्या टँकरच्या मदतीने गावातील नागरिकांनी मोठ्या धाडसाने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले.

# डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर महाविद्यालयास 'सेंटर ऑफ एक्सलन्स ए+ दर्जा प्राप्त



**नागपूर :** महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमा अंतर्गत डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर महाविद्यालयास 'वर्ष 2024-25 साठीचा सेंटर ऑफ एक्सलन्स ए+' दर्जा प्राप्त झाला व त्यासाठी करिअर कट्टा विभागाकडून यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण कार्यक्रमात महाविद्यालयास मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व धनादेश रु.1,00,000/ (रु. एक लाख) देऊन पुरस्कृत करण्यात आले.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई, सचिव, डॉ. सुधीर फुलझेले साहेब व इतर सर्व स्मारक समितीचे सन्माननीय सदस्य यांच्याकडून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दीपा पान्हेकर यांचे अभिनंदन करण्यात आले.

महाविद्यालयातील करिअर संसदेतील पदाधिकारी अभिषेक भुते (मुख्यमंत्री) हर्ष गणवीर (शिस्तपालन मंत्री), तनुश्री चौरपगार (सामान्य प्रशासन मंत्री) धनश्री चोपडे (उद्योजकता विकास मंत्री) अंश भुते (कौशल्य विकास मंत्री) प्रशिक बारसागडे (रोजगार मंत्री) लिंटा टॉमसन (संसदीय कामकाज मंत्री), अवनी बनकर (नियोजन मंत्री), निकिता मेश्राम (सदस्य) इत्यादींनी वेळोवेळी करिअर कट्टा उपक्रमांत सक्रिय दिला. या यशाबद्दल विध्यार्थ्यामध्ये अत्यंत आनंदाचे वातावरण आहे.

महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक म्हणून डॉ. विद्या चौरपगार व प्रा. विठ्ठल बोंदर यांनी काम पहिले. तसेच या यशामध्ये करिअर कट्टा अध्यक्ष श्री. यशवंत शितोळे, प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे (विभागीय प्राचार्य प्रवर्तक), प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे (प्राचार्य प्रवर्तक), डॉ. एस. डी. देशभ्रतार, डॉ. नरेंद्र रघटाटे (नागपूर विभागीय समन्वयक), डॉ. श्रीराम फरताडे (नागपूर जिल्हा समन्वयक) या सर्वाचे मोलाचे सहकार्य लाभले.

## 'कविता मार्च' 26 मार्च 2025 ला




**नागपूर :** करुणासागर बहुउद्देशीय संस्थे मार्फत जागतिक महिला दिन, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृती, समता सैनिक दल स्थापना दिन, महाड संग्राम क्रांती दिन, बाबूराव बागुल स्मृती, गंगाधर पानतावणे स्मृती, कवी ग्रेस स्मृती, ग़ज़ल सम्राट सुरेश भट स्मृती, डॉ. यशवंत मनोहर जन्म, भाऊ पंचभाई जन्म, हृदय चक्रधर जन्म यांचे औचित्य साधून 26 मार्च 2025 ला सायंकाळी 5.30 वाजता नटराज सभागृह, हिन्दी मोरभवन, सीताबर्डी, नागपूर येथे 'कविता मार्च' हा बहारदार कवी संमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

'कविता मार्च' या कार्यक्रमात ज्येष्ठ आंबेडकरी कवी आणि गीतकार आयु. इ.मो. नारनवरे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभेल. त्याचप्रमाणे आयु. शालिक जिल्हेकर आणि त्यांचा संच अभिवादन गीत सादर करेल. तसेच आदीम साहित्य संगितीचे अध्यक्ष आयु. प्रकाश दुलेवाले यांच्या मंच संचलनामध्ये डॉ. भीमराव गोटे, आयु. शालिक जिल्हेकर, आयु. भीमराव गणवीर, आयु. सरिता सातारडे, प्रा. प्रज्ञा बाली यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सिद्धार्थ मेश्राम, हृदय चक्रधर, ताराचंद चव्हाण, हेमलता हवले, डॉ. वैशाली धनविजय, प्रकाश कांबळे, विशाखा नकाशे, मधुकर बोरीकर, संजय गोडघाटे, रोशनी गणवीर, संजय सायरे, माधुरी वसंत शोभा, लिलाधर गायकवाड, सुषमा कळमकर, प्रकाश बावनगडे, माणिक खोब्रागडे, प्रतिभा सहारे, रंगराज गोसावी, मनोहर गजभिये, डॉ. भूषण भस्मे, चित्तरंजन चौरे, जगदीश राऊत, चरणदास वैरागडे, प्रभू फुलझेले, नागेश वाहुरवाघ, रजनी फुलझेले, दीपक पंचभाई, धम्मपाल फुलझेले, अरविंद शेलारे, सुभाष मानवटकर, राजू ढोके इत्यादी कवी चळवळीच्या कविता सादर करतील. 'कविता मार्च' या कार्यक्रमात आंबेडकरी कार्यकर्त्यांना नवोदित कवी कवयित्रींना बहुसंख्येने उपस्थित राहण्यासाठी करुणासागर बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रा. हृदय चक्रधर आणि सचिव प्रा. दामोधर वानखेडे यांनी आवाहन केले आहे.

## स्त्रीने आपल्या अस्तित्वाचा शोध घेणे म्हत्वाचे : विद्या भोरजारे



**नागपूर :** ध्रुवीकरणाचे प्रभाव आणि परिणाम स्त्रीवादी चळवळी आज मंदावलेल्या आहेत का या विषयावर वक्त्यांनी आपले विचार मांडले. अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन महामंडळ आणि निराळी आयोजित सोळावे अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य संमेलन 2025 अंतर्गत दुसऱ्या महिलांच्या परिसंवादात स्त्रियांच्या चळवळीतील ध्रुवीकरणाचे प्रभाव आणि परिणाम स्त्रीवादी चळवळी आज मंदावलेल्या आहेत का या विषयावरील परिसंमादात अध्यक्ष विद्या भोरजारे होत्या. वक्ते प्रा. सीमा मेश्राम, आर्याजी विजया मैत्री प्रा. अस्मिता दारुडे, प्रा. विशाखा कांबळे या परिसंवादातील स्त्रियांच्या चळवळीतील स्त्रीच्या एकतर शोषणाच्या संदर्भात स्त्रीने पेटुन उठले पाहिजे तर स्त्री ही शोषण मुक्त होइल विशाखा कांबळे यांनी एकतर बुद्धकालीन स्त्री चे संदर्भ घेवुन स्त्रियाचे शोषण व त्यांनी केलेला उठाव मनुस्मृती ची बंधने झुगारून संविधानाच्या चौकटीत राहून आपल्या हक्कासाठी लढले हेच स्त्रिच्या मुक्ती चे ब्रीद वाक्य ठरेलयांची सांगड घालून शोषण मुक्ती चा मार्ग सांगितला या कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुनंदा रामटेके यानी केले तर आभार निर्मलात जिवने यांनीआभार मानले.




## लोकेश चंद्र यांना केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळाचा पुरस्कार

**नागपूर :** महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळातर्फे (सीबीआयपी) ऊर्जा क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल शुक्रवारी नवी दिल्ली येथे पुरस्कार देण्यात आला. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर उपस्थित होते. लोकेश चंद्र म्हणाले की, आपल्याला मिळालेला पुरस्कार आपण नम्रतेने स्वीकारत असून याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील ऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनासाठी केलेल्या नेतृत्वाला आहे. तसेच आपल्याला सहकार्य करणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आपण आभारी आहोत. लोकेश चंद्र यांनी जून 2023 मध्ये महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर वीज ग्राहक केंद्रबिंदू मानून महावितरणच्या सेवांमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला. तसेच त्यांनी अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्यावर भर दिला आणि राज्याची आगामी काळाची गरज ध्यानात घेऊन ऊर्जा परिवर्तन आराखडा राबविण्यास प्राधान्य दिले. लोकेश चंद्र हे आयआयटी दिल्लीचे स्थापत्य अभियांत्रिकेचे पदवीधर आहेत. तसेच त्यांनी एम. टेक पदवी प्राप्त केली आहे. ते 1993 च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. महावितरणच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी त्यांनी सिडकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक तसेच नागपूर, भंडारा व गोंदिया या जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे. त्यांनी केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयात संचालक व पोलाद मंत्रालयात सहसचिव म्हणूनही काम केले आहे.

## ग्रंथलेखक मारोतराव चोपणे यांना श्रद्धांजली



**चंद्रपूर :** मानवतेचे महान पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत बाजीराव महाराजांच्या विचारांचे उपासक , धार्मिक ग्रंथलेखक तथा कवी मारोतराव चोपणे (वणी) यांचे वृध्दपकाळाने वयाच्या 90 व्या वर्षी निधन झाले.

राष्ट्रसंत विचार साहित्य परिषद केंद्रीय समिती चंद्रपूरच्या वतीने ऑनलाईन श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर होते . याप्रसंगी एड. राजेंद्र जेनेकर (राजुरा) यांनी सभेची प्रस्तावना करून मारोतराव चोपणे यांच्या जीवन कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला .

तर योगतज्ञ विनायक साळवे (बल्लारपूर), नामदेव गेडकर (चंद्रपूर), इंजि. विलास उगे(नागपूर), ललिता भागवत (कळमेश्वर), संदीप कटकुरवार (ब्रम्हपुरी) यांनी मारोतराव चोपणे यांनी तळमळीने केलेले प्रचारकार्य यासंबंधीत विचार व्यक्त केले तर डॉ.श्रावण बानासुरे (बल्लारपूर), प्रा. नामदेव मोरे (घुग्घुस)यांनी दिवं. चोपणे काका यांनी केलेल्या लेखन कार्यावर प्रकाश टाकला. अँड . सारिका जेनेकर, प्रकाश सोनटक्के, रमेशचंद्र सरोदे (साहुर), संजय तिळसमृतकर, रविंद्र भेदोडकर, प्रभाकर नवघरे सांगडी (तेलंगण स्टेट), मनोहर बोबडे, सुभाष पावडे (राजुरा),भाऊराव बोबडे (रामपूर), पालिकचंद बिसने (भंडारा), सुरेश डांगे (चिमूर) यांनी चोपणे काकांनी श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यात दिलेले योगदान सांगत त्यांच्या काही आठवणी कथन केल्या. कार्यक्रमाध्यक्ष बंडोपंत बोढेकर म्हणाले की, ज्येष्ठ गुरुदेव उपासक दिवं. मारोतराव चोपणे यांनी राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रचार प्रसार यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागात केला. संत बाजीराव महाराजांच्या प्रेरणेने त्यांनी ग्रंथ निर्मिती केली. काव्यलेखन केले. आपले जन्मगाव सावर्ला ग्रामगीता ग्रंथानुरूप घडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शासनाचे स्वच्छता व तंटामुक्त गाव अभियान राबविण्यात त्यांना यश मिळाले. एकंदरीत त्यांनी ग्रामगीतेतील ग्रामसुधारणेचा विचार रूजविण्याचे केलेले सेवाकार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत बंडोपंत बोढेकर यांनी व्यक्त केले. या सभेचे तंत्रनियोजन डॉ. श्रावण बानासुरे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. धर्मा गांवडे (सावली )यांनी केले. राष्ट्रवंदना व जयघोषानंतर सभा संपन्न झाली.

## भदंत नागार्जुन सुरई ससाई यांनी प्रधानमंत्रीना लिहिलेले ते पत्र



**नागपूर :** भदंत नागार्जुन सुरई ससाई यानी प्रधानमंत्रीना वर्ष 1993 ला पत्र दिले होते.बुद्ध गया महाबोधी महाविहार संपूर्ण विश्वातिल बौद्ध यांचे पवित्र धार्मिक स्थल आहे. येथील संचालन समिति मध्य बदल करन्या करिता वर्ष 1993 ला चौथा टप्या मध्य आंदोलन सुरू होते. भारतात सर्व ठिकानी आंदोलन त्रिव रूप धारण करीत होते. या करिता पुज्य भदंत नागार्जुन सुरई ससाई , राष्ट्रीय अध्यक्ष, बुद्ध गया महाबोधी महाविहार आल इंडिया एक्शन कमेटी तर्फ पी.वी. नरसिंह राव, तत्कालीन प्रधानमंत्री, भारत सरकार, याना पाच पत्राचे निवेदन 16/08/1993 ला देन्यात आले. या पाच पत्राची प्रति सामाजिक कार्यकर्ता अधिर बागडे रा. वैशाली नगर नागपुर, यानी 32 वर्षा पासून जपुन ठेवले होते. पाच प्रति मध्ये 18 सुचना सविस्तर लिहिल्या होत्या. या प्रती भदंत नागार्जुन सुरई ससाईजीना इंदोरा बुद्ध विहार, येथे सुपूर्त करण्यात आली. सोबत भिक्षु संघ व मिलिंद गोंडने उपस्थित होते.




### सिद्धार्थ बुद्ध विहार कामठी

सिद्धार्थ बुद्ध विहार कामठी या विहारात सातत्याने सतत कार्यक्रम सुरू असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमाई जयंती, बुद्ध जयंती, महात्मा फुले जयंती, सावित्रीबाई निमित्त कार्यक्रम, जागतिक महिला दिन, शाळा प्रवेश दिन 7 नोव्हेंबरला, संविधान दिवस,, धम्मा चक्र प्रवर्तन दिन, असे विविध प्रकारचे कार्यक्रम या विहारात राबवले जातात. तसेच करंट येणारे इशू यातही यांचा सहभाग सातत्याने असतो. प्रत्येक पौर्णिमेला खीर दान करतो

संवाद मित्र,
मीना चव्हाण 8805716250

## बुद्ध गया महाविहार बौद्धांच्या स्वाधीन करा : बरिएमं



**नागपूर :** जिल्हाधिका-यांमार्फत राष्टपती, पंतप्रधान यांना निवेदन नागपूर, 22 मार्च 1949 चा टेम्पल ?क्ट रद्द करून बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या स्वाधीन करण्यात यावे, या मागणीचे निवेदन बहुजन -रिपब्लिकन एकता मंच, नागपूर शहरच्या वतीने नुकतेच जिल्हाधिकारी श्री. विपीन इटणकर यांच्या मार्फत राष्ट्पती, पंतप्रधान, बिहारचे मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आले. बुध्द गया हे जगातील सर्व बौध्द धर्मीयांचे प्रेरणास्थान आहे. बुध्द गया मुक्ती आंदोलन ब-याच काळापासून सुरू आहे. मात्र सरकारने बुद्ध गया टेम्पल ?क्ट 1949 रद्द करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. प्रत्येक समुदायांचे धार्मिक स्थळ हे त्या त्या समुदायाच्या स्वाधीन आहे. मात्र बुध्द गया येथील बौद्धांच्या धार्मिक स्थळावर इतर धर्मांचा ताबा आहे. हा बौध्द समाजावर कायद्याने अन्याय आहे. ??त्यामुळे 1949 चा टेम्पल ?क्ट रद्द करून बुध्द गया येथील महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या स्वाधीन करण्यात यावे, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा बहुजन -रिपब्लिकन एकता मंचच्या वतीने देण्यात आला आहे. बहुजन -रिपब्लिकन एकता मंचच्या शहराध्यक्ष माजी नगरसेविका वंदना भगत यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळात नंदा गोडघाटे, विशाखा कांबळे, वंदना हिरेखण, जया पानतावणे, रत्नमाला मेश्राम, सविता पाटील, बेबीनंदा कांबळे, आशुलता बागडे, कलावती बलवीर, आशा डोंगरे, सुनीता सोमकुवर, नरेंद्र चव्हाण, विजय गोडघाटे, आदींचा समावेश होता.

नागपूर ताज फर्निचर ॲण्ड रिपेअर



: संपर्क :
मो. 9511632051

# नागपूरातील संचारबंदी शिथिल ...

**नागपूर :** सोमवारी उसळलेल्या दंगलीच्या घटनेनंतर शहरातील पोलिसांनी 11 पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू केली होती. त्यामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले होते. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संचारबंदी उठविण्यासंदर्भात सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार रविवारी दुपारी तीन वाजतापासून संपूर्ण शहरातील संचारबंदी हटवण्यात आली. शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी उपाययोजना म्हणून शहरातील 11 पोलीस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदीचे आदेश लागू करण्यात आले होते. मात्र, दंगलग्रस्त भागाशिवाय अन्य परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण झाला नाही. त्यामुळे टप्प्याटप्प्याने संचारबंदी उठविण्यास पोलीस आयुक्तांनी परवानगी दिली होती. गुरुवारी नंदनवन व कपिलनगरमधील संचारबंदी पूर्णतःहटविण्यात आली. तर शनिवारी पुन्हा पाच ठाण्यांतर्गत संचारबंदी पूर्णतः हटविण्याचे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले. यामध्ये परिमंडळ 3 अंतर्गत येणाऱ्या पाचपावली, शांतीनगर, लकडगंज तसेच परिमंडळ 4 अंतर्गत येणाऱ्या सक्करदरा आणि इमामवाडाचा समावेश आहे. मात्र, यशोधरानगरात संचारबंदी कायम ठेवण्यात आली होती. कोतवाली,



तहसील, गणेशपेठमध्ये सायंकाळी 7 ते रात्री 10 वाजतापर्यंत संचारबंदी शिथिल करण्यात आली होती.

त्यानंतर त्यांनी पाचपावली, शांतीनगर, लकडगंज, सक्करदरा आणि इमामवाडा ठाण्यांतर्गत संचारबंदी पूर्णतः हटविण्याचे निर्देश दिले. परिमंडळ तीनमधील कोतवाली, तहसील, गणेशपेठ हद्दीतील संचारबंदीमध्ये शिथिलता देण्यात आली. सायंकाळी 7 ते रात्री 10 या कालावधीत लोक बाहेर पडू शकतात आणि या वेळेत जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करता येऊ शकते, असे पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केले होते. तरीही अनेकांना सामान्य जीवन जगताना अनेक अडचणी येत होत्या.

### पोलीस बंदोबस्त कायम

भालदारपुरा, मोमीनपुरा, चिटणीस पार्क चौक, हंसापुरी यासह अन्य तणावग्रस्त भागात पोलिसांचा तगडा बंदोबस्त कायम ठेवण्यात आला आहे. या भागातील संचारबंदी उठवली तरी सशस्त्र जवान अजुनही रस्त्यावर कायम ठेवण्यात आले आहे. तसेच पोलिसांची गस्तसुद्धा या परिसरात वाढविण्यात आली आहे. संचारबंदी हटवल्यानंतरही कुणी संशयास्पद स्थितीत फिरताना आढळल्यास किंवा संशयास्पद हालचाली करीत असल्यास ताबडतोब ताब्यात घेण्याचे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले आहे.

## साहित्यिकाचे कुटुंब व सत्ताधाऱ्यांमध्ये वाद




**अकोला :** मूर्तिजापूर येथील एका शाळेच्या इमारतीवरून साहित्यिकाचे कुटुंब व सत्ताधाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला आहे. काँग्रेस विचारसरणीचे कुटुंब असल्याने सत्ताधारी प्रशासनावर दबाव टाकून शाळेच्या इमारतीवर कारवाईस भाग पाडत असल्याचा गंभीर आरोप ज्येष्ठ साहित्यिक डॉ.श्रीकांत तिडके यांचे पूत्र सार्थ तिडके यांनी केला. त्यावर भाजप आमदार हरीश पिंपळे यांनी ती इमारत नियमानुसार असल्याची कागदपत्रे संबंधितांनी दिल्यास आपण स्वतः त्यावरील कारवाई रोखू, असे प्रत्युत्तर दिले. या प्रकरणी विनापरवानगी इमारत उभारण्यात आल्याचे नगरपालिकेने स्पष्ट केले. या मुद्द्याला राजकीय रंग दिला जात असल्याची चर्चा आहे.

मूर्तिजापूर नगरपालिकेच्या हद्दीमध्ये दोन इमारती बांधण्यात आल्या आहेत. एक इमारत कॉम्प्लेक्स, तर दुसऱ्या इमारतीमध्ये परम महासंगणकाचे जनक डॉ. विजय भटकर यांच्या संस्थेद्वारे शाळा चालवली जाते. प्रस्तावित डीपी रस्त्यावर त्या इमारतीचा भाग येत असून इमारत उभारताना परवानगी घेतली नसल्याचे मूर्तिजापूर नगरपालिकेचे म्हणणे आहे. या प्रकरणी नगरपालिकेने डॉ. श्रीकांत तिडके यांच्या नावाने नोटीस बजावली. मात्र, ती जमीन व इमारत डॉ. तिडके यांच्या पत्नीच्या नावाने आहे. त्यामुळे नियमबाह्य पद्धतीने नगरपालिकेने नोटीस बजावली, असे तिडके कुटुंबीय म्हणाले.

जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५

स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648